




# चैतन्य लहरी

अंक क्र. ३ व ४ मार्च-एप्रिल २००१






मानवरत्न पुरस्कार प्रदान समारंभ
२३ फेब्रुवारी २००१, पुणे



शिव-पूजा, पुणे
२५ फेब्रुवारी २००१



कळवा पूजा
३१ डिसेंबर २०००, कळवा, मुंबई



शिव-पूजा, पुणे
२५ फेब्रुवारी २००१

# • अनुक्रमणिका •


| | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | लेकुरे उदंड जाहली | २ |
| २ | शिवपूजा<br>प. पू. श्री माताजींचे भाषण<br>पुणे २५ फेब्रु. २००१ | ३ |
| ३ | शिव-पूजा पुणे वृत्तांत | ६ |
| ४ | मानवरत्न पुरस्कार प्रदान समारंभ<br>वृत्तपत्रातील कात्रणे | १० |
| ५ | आदीगुरू दत्तात्रयांचे दहा अवतरणे<br>राजा जनक | १३ |
| ६ | शिव-पूजा पुणे २००१ काही क्षणचित्रे | १४ |
| ७ | दिपावली पूजा<br>लॉस एंजलीस<br>२८ ऑक्टोबर २००० | १६ |
| ८ | अमृतवाणी | १९ |
| ९ | नवरात्री पूजा<br>कबेला ८ ऑक्टो. २००० | २० |
| १० | प. पू. श्रीमाताजींचे प्रवचन<br>राहूरी २६ फेब्रु. ८४ | २३ |


सहजयोगी म्हणून तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुम्हाला मिळालेल्या प्रकाशामधे, तुमच्या चेतेनमधे पडलेल्या प्रकाशामधे तुम्हाला पुढे चालायचे आहे.

प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी, नवरात्री पूजा
कबेला ८ ऑक्टो. २०००

# लेकुरे उदंड जाहली

आजकाल आपल्या अवतीभोवतीच्या परिस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणावर उलथापालथ चालली असल्याचे रोजच्या व नवनवीन घटनांवरून जाणवते. भ्रष्टाचार, राजकीय डावपेच, वैधानिक व्यासपीठांमधील वाढती बेशिस्त, आरोप-प्रत्यारोप, अनैतिक घटना, संपत्ति व सत्तेचा गैरवापर, यासारख्या घटनांचे पेव फुटल्यासारखे वातावरण आहे. त्यात भर म्हणून बाजारुपणा, उथळ लोकप्रियता, अत्याचार, गुन्हेगारी, खून, मारामाऱ्या, दरोडे, खंडणी या तर रोजच्याच बातम्या झाल्या आहेत. एकूण परिस्थिति कुठल्या थराला जाणार आहे व त्यातून सुधारणा होण्याची काही आशा आहे की नाही अशी शंका सुजाण माणसाच्या मनांत डोकावत आहे.

पण एकंदर मानव-जीवनाचा व त्याच्या उन्नतिप्रक्रियेचा विचार केला तर अशा संकटकाळामध्येच राक्षसी प्रवृत्तींचा नामशेष होऊन मानव समाज पुन्हा एकदा गौरवशाली जीवनाकडे वळल्याशिवाय राहणार नाही असाच इतिहास सांगतो. राक्षसांच्या संहारासाठी परमात्म्याला वेळोवेळी अवतार धारण करावा लागला हे आपली संस्कृति सांगतेच. तेच कार्य सध्याच्या आदिशक्तीच्या प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींच्या अवतरणामधून होणार आहे.

आपण सर्व सहजयोगी श्रीमाताजींचे या लढाईचे हात व आयुधे आहोत आणि आपल्यालाच ही लढाई लढायची आहे. आपण तसे मोठ्या संख्येने सिद्ध राहिलो की आपल्या पाठीशी आदिशक्ती आहेच. हेच आजकाल श्रीमाताजी आग्रहाने व तळमळीने सांगत आहेत. मूलभूत मूल्यांची कदर व आदर, सभ्यता व संस्कृतीचा मान, आत्मसन्मानाची प्रतिष्ठा इ. पुनर्प्रस्थापित झाल्याशिवाय मानवसमाजाचे हे परिवर्तन अशक्य आहे. त्यासाठी आपल्या हृदयातून प्रेम व समर्पणाची शक्ति प्रवाही व कार्यान्वित व्हायला हवी. सहजयोग्यांना त्यासाठीच श्रीमाताजींनी शक्ति दिली आहे. म्हणूनच आपण सहजयोगामध्ये उंची व गहनता या दोन्ही गोष्टींची जोपासना करण्यावर श्रीमाताजींनी अलिकडील पूजा-प्रवचनामधे भर दिला.

चला तर, आपण सर्वांनी प्रतिज्ञा करू या की आम्ही समर्पित होऊन अधिकाधिक कार्य करू व प. पू. श्रीमाताजींना आपल्याकडे पाहिल्यावर ''लेकुरे उदंड जाहली'' असे म्हणावेसे वाटेल असे सहजयोगी बनू.

# शिव-पूजा
## (महादेव पूजा)

**प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण**
**पुणे : २५ फेब्रु. २००१**

आज आपण शिवरात्र साजरी करणार आहोत. आत्मसाक्षात्कार मिळाल्याशिवाय श्री महादेवांसारख्या अलौकिक देवतेचे महात्म्य आणि त्यांचे कार्य व शक्ति समजणे असंभव आहे. एरवी या महान शक्तीला जाणणे वा त्याची कल्पना करणे अशक्य आहे. म्हणून आपण सर्वांनी अत्यंत नम्र होऊनच त्यांच्या कृपाचरणांशी प्रार्थना केली पाहिजे. या पवित्र चरणांच्या दर्शनासाठी आपल्याला सहस्राराच्याही पलीकडे जायचे आहे. ते आपल्या तर्कशक्तिच्या पलीकडे असले तरी आत्मा म्हणून तेच आपल्या हृदयात आहेत, व आत्मसाक्षात्काराच्या वेळी त्यांचे हेच प्रतिबिंब प्रकाशित होते.

श्री महादेवांची महत्त्वाची शक्ति म्हणजे ते पराकोटीचे क्षमाशील आहेत; आपल्या सर्व प्रकारच्या पापांची, विघातक प्रवृत्तींची व सर्वांनाच त्रासदायक ठरणाऱ्या भौतिक हव्यासांची ते क्षमाच करतात. पण त्यालाही सीमा आहे आणि ती ओलांडल्यावर त्यांची विनाशकारक (संहारक) शक्ति कशी प्रगट होईल सांगता येणार नाही. सर्व पंचमहाभूततत्त्वे त्यांच्या अधिपत्याखाली आहेत; म्हणून त्यांची संहार करण्याची ताकदही प्रचंड आहे. त्या बाबतीत मीही काही करु शकत नाही. या पृथ्वीच्या पाठीवर काय चालले आहे, लोक कुठे काय चुका करत आहेत हे त्यांना दिसत असते. आता गुजरातचेच उदाहरण पहा. ते लोक पैशामधे अत्यंत गुंतलेले आहेत, पैशाशिवाय त्यांच्या डोक्यांत दुसरा विषयच नसतो. मग त्यांना सहजयोग काय समजणार? भावनगरचे काही सहजयोगी चांदीच्या पादुका घेऊन माझ्याकडे आशीर्वादासाठी आले; मला बरे वाटले; मग त्यांनी तिकडे जाऊन पूजा व हवन केले, बडोद्यात पण केले आणि या दोन्ही ठिकाणी नुकत्याच झालेल्या भूकंपाचा जराही धक्का बसला नाही तर जवळच्याच सुरतला त्याची फार मोठी झळ लागली. म्हणजे तुमच्या आईचे संरक्षण आणि परमेश्वराचा अनावर संताप हे दोन्ही यामधे दिसून येतात. याचा अर्थ नीट समजला पाहिजे. दुसरी गोष्ट फ्रान्सची, मी तिकडे गेले होते तेव्हा माझ्याविरुद्ध सर्व तऱ्हेचा अपप्रचार तिथे चालला होता. त्याच काळी तिथे समुद्रामध्ये अचानक वादळ निर्माण झाले आणि त्यांच्या दोन बोटी बुडाल्या; इतकेच नव्हे तर हे वादळ आत आल्यावर तेथील अनेक चर्च व आतील घरे जमीनदोस्त झाली. तरीही मी तिथे नुकत्याच खरेदी केलेल्या वास्तूला त्याचा धक्का लागला नाही कारण तेथपर्यंत येताच ते वादळ शांत झाले. ही सर्व महादेवांची किमया. म्हणजे त्यांची क्षमाशीलता महान असली तरी त्यांच्या शक्तीचा तुम्हाला विसर पडून चालणार नाही. यावरून हेच दिसून येते की माझ्या कार्यापाठीमागे त्यांचेच पाठबळ व शक्ति आहे म्हणून या अध्यात्मिक उन्नतीच्या कार्याला विरोध खपवून घेतला जाणार नाही.

शिवांचे कृपाशीर्वाद मिळणे परम भाग्य आहे. ते अत्यंत दयाळू व क्षमाशील आहेत. तुमच्या हृदयात जेव्हा क्षमाशीलता पूर्ण जागृत होते तेव्हा तेच तुमच्या हृदयात प्रसन्न होतात. तसे नसते तेव्हा तुम्हाला अनेक गंभीर आजार होऊ शकतात. तुम्ही क्षमा करत राहता तेव्हा तुमचे हृदय जास्त चांगल्या तऱ्हेने चालते आणि हृदयविकार होत नाहीत. याच्या उलट तुम्ही चुकीच्या गोष्टी करता, चुकांकडे दुर्लक्ष करता, परमेश्वराला विसरून स्वतःचे कर्तुत्व मिरवता तेव्हा ते कमजोर होत जाते. आक्रमकपणा व कसल्या तरी समजुती पसरवून हिटलरासारखे जे दुसऱ्यांना छळतात तेव्हा तर हे हृदय काम करेनासे होऊन त्यांना हार्ट-अटॅक हमखास येतात. तसेच सर्व अपमान गिळत राहिले व सतत असुरक्षितपणा व भीतीचे दडपण सहन करत बसले तर अंजायनासारखे हृदयविकार होतात. म्हणून या बाबतीतही काळजी घेणे जरुरीचे आहे.

अध्यात्मिक विचारामधे सहनशीलतेला अर्थ आहे पण भीतिपोटी सर्व सहन करत राहणे चूक आहे. सहजयोग्यांना तर कशाचीही भीति बाळगण्याची जरुर नाही. याचा अतिरेक म्हणजे भारतातील स्त्रिया झुरळालाही घाबरतात! हा खरोखरच मूर्खपणा आहे. कदाचित समाजाने महिलांना फार हीन व गौण स्थान दिल्यामुळे, विशेषतः उत्तर भारतात, ही संवय जडली असावी. त्यामुळेच मुळात चांगल्या स्वभावाच्या असूनही त्यांच्यामधे शारीरिक व मानसिक आजार उद्‌भवतात. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावरची स्त्री-शक्ति वाया जात आहे. अशा समाजाचा वा राष्ट्राचा उत्कर्ष कधीच होणार नाही. असे प्रकार वाढले की महादेव नाराज होतात व शिक्षा करतात.

**महादेव सदैव दयाळु आहेत व पीडितांचा नेहमीच सांभाळ करत असतात व त्यांना त्रास देणाऱ्यांना शासन करतात.** ते कुण्डलिनी व आत्मसाक्षात्कार बघत नाहीत. पण छळवाद मांडणाऱ्यांना कठोर शिक्षा देतात. त्यांची ही कार्यपद्धती समजून घेतली पाहिजे. त्याचबरोबर सर्व पशु-पक्षांनाही तेच संरक्षण पुरवतात. निसर्गाला पण त्यांचाच आधार आहे. शिवाय अध्यात्मिकतेमधून मिळणारा आनंद ही त्यांचीच कृपा आहे. **एका मर्यादेपर्यंत ते सर्व दुर्लक्ष करतात पण अति झाल्यावर संहार-शक्ति चालवतात.** पाश्चात्य देशांमधील महिला फार आक्रमक वृत्तीच्या असतात, नम्रपणा त्यांना माहीतच नसतो, प्रेम कशाला म्हणतात त्यांना माहीतच नाही. अर्थात त्या बाबतीत तिकडे पुरुषांचीही तीच तऱ्हा आहे. म्हणूनच त्यांच्यावर महादेवांची अवकृपा होते व भयानक रोग त्यांना ग्रासून टाकतात. जिथे जिथे आक्रमक लोकांचे थेर चालतात तिकडे महादेवांचा तिसरा नेत्र लागलेलाच असतो याची खात्री ठेवा; तो केव्हा उघडेल सांगता येणार नाही.

श्री महादेवांनी माणसाला हिमालयाप्रमाणे उच्च पदावर पोचण्याची क्षमता दिली आहे. त्यांनी अत्यंत सुंदर तऱ्हेने मानव बनवला आहे व सर्व मानवांनी एकमेकांवर प्रेम करावे ही त्यांची इच्छा आहे. माणसांनी एकमेकांबरोबर सलोख्याने, गुण्या-गोविंदाने वागावे ही त्यांची अपेक्षा आहे. याचा अभाव असतो तिथे माणूस चुकीच्या मार्गाकडे चालला आहे असे समजावे. **त्यांचे पराकोटीचे आशीर्वाद म्हणजे तुम्हाला उंची व खोली - उच्च स्थिति व गहनता-तेच प्रदान करतात.** त्यांची मनोभावे पूजा करणाऱ्यांना ते इतके उंचावर घेऊन जातात की समस्त जगाकडे तुम्ही साक्षी बनून पाहू लागता. म्हणून परम सत्य व परिपूर्ण ज्ञानाचे तेच अधिष्ठान आहेत. **तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला, थंड चैतन्याची जाणीव झाली. पण ज्ञानही व्हायला हवे.** तेच सर्व ज्ञान मी देत असते. श्रीमहादेव त्याच ज्ञानाचे स्वरुप आहेत; हेच ते अत्युच्च कोटीचे शुद्ध परिपूर्ण ज्ञान; सर्व ज्ञानाचे मूळ स्रोत तेच आहेत. त्यांच्या चरणाशी अत्यंत नम्र झालेल्यालाच त्यांची प्राप्ती होते. जे अति अहंकारी असतात, इतरांशी प्रेमाने, सौजन्याने, हळुवारपणे वागत नाहीत त्यांना हे आशीर्वाद मिळत नाहीत. जीवनामध्ये ऐश्वर्य, पैसा, सत्ता इ. पेक्षा मिळवण्यासारखे काही असेल तर हेच. ते मिळवण्यासाठी स्वच्छ, निर्मळ अंतःकरण हवे. तुमच्या हृदयात शिव प्रसन्न असले की तुमच्या हृदयातून प्रेमाचा प्रवाह पाझरु लागतो. हे शुद्ध, निर्व्याज प्रेम असते. मग तुमचे सर्व प्रयत्न संपतात; जी काही शक्ति तुमच्यामधे असते तिचा सदुपयोग तुम्हाला करावासा वाटतो. शिवांची शक्ति प्रचंड आहे, वेळ पडली तर या पृथ्वीवर गवताची पातही राहणार नाही इतकी ती महान आहे पण ते तुमचे सर्व अपराध गिळत राहतात.

आणखी एक शिवांची महानता म्हणजे ते जितके क्षमाशील आहेत तितकेच ते उदार आहेत; त्यांच्या औदार्याला सीमा नाहीत. उदा. काही सज्जन प्रवृत्तीचे लोक वाळवंटात कष्टात रहात असलेले पाहिले तर त्यांच्यासाठी ते पाणतळ निर्माण करतील कारण भूमीतत्वावर त्यांचीच सत्ता आहे. पण मनुष्य जातच इतकी चमत्कारिक आहे की देवाच्या नावाखालीही ते भांडण-मारामारी करतात. दक्षिण भारतातही शैव व वैष्णव असेच भांडत असतात. अशा लोकांनाही शिव शासन करतात. देवावर खरोखर श्रद्धा असेल तर तुम्हाला इतरांवर प्रेमच करायला हवे; असे प्रेम सर्वत्र जगभर पसरावे हे माझे स्वप्न आहे. तसे न करणाऱ्या लोकांचा शिवांकडून संहारच होणार आहे. भौतिक उपभोगांच्या मागे लागलेल्या लोकांना प्रेम समजत नाही. शिवांच्या आशीर्वादाला पात्र ठरण्यासाठी आपणल्याला नम्र व प्रेमळ असले पाहिजे. मी पण सर्वांवर सारखेच प्रेम करत असते; पण माझ्याशी अप्रमामाणिकपणा करणाऱ्यांना शिवच शिक्षा करतात, मला ते करावे लागत नाही. म्हणून हे नीट समजून घ्या की शिवांचे आशीर्वाद मिळवण्यासाठी तुम्ही सहजयोग्यांनी प्रेमळ, उदार व समंजस असले पाहिजे;

अबोधित झाले पाहिजे. मग तुमची ही अबोधितता पण सांभाळली जाते. जिथे जाल तिथे शिव तिसऱ्या नेत्रामधून लक्ष ठेवतात. त्यांचे प्रेम, करुणा व मार्गदर्शन सदैव तुमच्या पाठीशी असते. पण म्हणूनच आपण काय करतो याबद्दल तुम्ही जागरुक असायला हवे; आपण बोलतांना कटु शब्द ढाळतो का व आक्रमकपणा गाजवून दुसऱ्याला त्रास देत आहोत का इकडे पहा.

**साऱ्या निसर्गामध्येही शिवांचेच साम्राज्य आहे;** पशु-पक्षीही त्यामुळे एकमेकांशी नीट वागतात. उदा. जंगलात जेव्हा वाघ बाहेर येतो तेव्हा सगळीकडे निःशब्द वातावरण असते, हा त्याचा मान राखला जातो, त्याने भुकेसाठी एखादा पशू मारला की सर्वप्रथम त्याचे कुटुंब मांसभक्षण करणार, नंतर इतर प्राणी एकापाठोपाठ खाणार व सगळ्यात शेवटी कावळे खाणार. हे सर्व शिस्तीत चालते. या सर्वांच्यामागे शिवांचीच सत्ता आहे. पण त्याच प्राण्यांपासून प्रगत झालेल्या माणसांचे प्रकार पाहिले की नवल वाटते. पशू एकमेकांत कळपा-कळपामधून मारामाऱ्या करत नाहीत, माणसे मात्र ती शिस्त पाळत नाहीत. निसर्ग व पशुपक्षी शिवांच्या सत्तेमुळे व्यवस्थित व शिस्तीत असतात. पृथ्वी, आकाश इ. तत्त्वेही त्यांच्या सत्तेनुसार चालतात; ऋतुचक्र, फुलझाडांचा बहर, वृक्ष-संगोपन इ. ही असेच व्यवस्थित चालते. त्याचबरोबर सर्व कला, संगीत व तालबद्ध निसर्गाचे ते बादशहा आहेत. **जीवनात व निसर्गात सर्वात लय भरुन आहे. आपल्याला ती जाणवली पाहिजे. नऊ महिन्यानंतरच्या गर्भावासामधून बालकाचा जन्म होणे, निरनिराळ्या ऋतूंमध्ये त्या-त्या फळा-फुलांचे उमलणे, वेळेप्रमाणे ऋतूंचे आगमन होणे व बदलणे हे सर्व लयीमधे चालण्यामागील सत्ता शिवांचीच आहे. सगळ्या सृष्टीमधील ही लयबद्धता तुम्ही समजून घेतली पाहिजे.**

पण माणसेच त्यांच्यामधील अहंकारामुळे विचित्र वागतात; उगीचच प्रत्येक गोष्टीबद्दल टीका करतात, 'मला हे आवडत नाही' ही भाषा वापरत राहतात किंवा कुणाला भेट द्यायची असेल तर कमी किंमतीची वस्तू काय घ्यावी हे बघतील. खरे म्हणजे तुम्ही जे काय देता, करता व बोलता त्यातून प्रेम व्यक्त व्हायला हवे. तुम्ही कोण आहात, श्रीमंत आहात का इ. फालतू गोष्टींचे प्रदर्शन करण्यात अर्थ नाही. सहजयोग्यांनी प्रेम हेच जीवन आहे, अध्यात्म आहे व भाषाही आहे हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. सहजयोगाचे कार्यही प्रेमासाठी केले पाहिजे, प्रदर्शन किंवा मोठेपणा मिळवण्यासाठी नाही. त्यातूनच मग तुम्हाला अलिप्तता (detatchment) येते व जे काही करता त्याचा आत्मिक आनंद मिळतो. हिरा जसा चमकतो तसे तेजस्वी सहजयोगी म्हणून तुम्ही उठून दिले पाहिजे. मग तुम्हाला उच्च स्थिति व गहनता दोन्ही प्राप्त होईल.

असे प्रेम तुमच्या हृदयातून प्रगट होईल असे सहजयोगी तुम्हाला बनायचे आहे. प्रेम नेहमी शुद्ध असले पाहिजे, त्याच्यामधे अधिकार, आक्रमकपणा असता कामा नये. आजकालच्या माणसा-माणसांमधे त्याचा अभाव आहे. **पण हे सर्व सुधारून मानव-जातीमधे एक दिवस असा उगवणार आहे की सगळीकडे प्रेमच नांदू लागेल आणि आकाशातूनही माणसांवर पुष्पवृष्टी होईल आणि महादेव आपला तिसरा डोळा बंद करतील. मानवजातीचे हे भविष्य मला दिसत आहे.**

सर्वांना अनंत आशीर्वाद

●●●

## अमृत-वाणी

– सहजयोगी आळशी नसतो. तो हिमालयात जात नाही की आपला व्यवसाय सोडत नाही; जिथे असेल तिथेच समाधानी असतो. स्वतःच्या भोवताली सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्यावर अवलंबून असणाऱ्यांना स्वतःच्या ईश्वरी प्रेमशक्तीच्या जोरावर इतरांना ईश्वरी आशीर्वादाची प्राप्ति करून देण्याच्या प्रयत्नांत असतो. दुसऱ्याकडून घेण्यापेक्षा इतरांना देण्यास उत्सुक असतो.

# शिव-पूजा वृत्तांत

## पुणे : २३-२४-२५ फेब्रु. २००१



प. पू. श्रीमाताजींसमोर महाराष्ट्रातर्फे लेजिम सादर करताना

पूर्वतयारी

गतवर्षीप्रमाणे या वर्षीही प. पू. श्रीमाताजींच्या कृपाशीर्वादाने पुणे येथे शिवपूजेचा कार्यक्रम झाला. फेब्रुवारी २३, २४, २५ असा तीन दिवसांचा कार्यक्रम आखण्यात आला होता; अर्थात ही पूजा आंतरराष्ट्रीय सहजयोग्यांतर्फे होती. छत्रपती शिवाजी क्रीडासंकुल (बालेवाडी) येथील प्रशस्त प्रांगणांत सर्व कार्यक्रम पार पडला. इतर राज्यातील व परदेशातील सहजयोग्यांचे सहकार्य होतेच पण सर्व कार्यक्रमांची आखणी व नियोजनात पुणे-केंद्राचा महत्त्वाचा भाग होता. जानेवारीच्या सुरवातीपासूनच कार्यक्रमाच्या तयारीचे सविस्तर नियोजन ठरवण्यात आले; कामाचा व्याप प्रचंड असल्यामुळे व परगांवाहून येणाऱ्या सहजयोग्यांच्या मोठ्या संख्येमुळे रजिस्ट्रेशन, स्वागत, निवास, वाहन-सेवा, चहा-नाश्ता-भोजन, संगीत व सांस्कृतिक कार्यक्रम, पूजा-व्यवस्थापन, प्रसाद-तीर्थ-कुंकु वाटप, फोटो-व्हीडिओ, ध्वनिप्रक्षेपण-टीव्ही, सुरक्षा-व्यवस्था, स्टेज व सजावट, सर्व कार्यक्रमांचे समायोजन इ. विविध प्रकारच्या जबाबदाऱ्यांसाठी वेगवेगळ्या २०-२५ कमिट्या स्थापण्यात आल्या व त्यामुळे सर्व कार्यक्रमात सुव्यवस्था व सुसूत्रीकरण उत्तम प्रकारे पार पडले. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या तिन्ही दिवसात वातावरण प्रसन्न, उत्साहपूर्ण व चैतन्यमय होते आणि त्याचा आनंद व समाधान कार्यकर्ते व उपस्थित सहजयोग्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वहात असल्याचे जाणवले. **संगीताच्या कार्यक्रमाच्या आखणीची, नियोजनाची व सुसुत्रतेची जबाबदारी श्री. अरूण आपटे यांनी सांभाळली.**

सजावट

स्वागत-कमानी, पताका, प्रवेशद्वार, मुख्य स्टेजच्या आसपास पडदे, झालरी व कारपेट इ. सर्व सजावट मेहनतीने व कलात्मक पद्धतीने केली होती. स्टेजच्या मधोमध प्लास्टर ऑफ पॅरिसमध्ये उंचावर भव्य कमळाचे डेकोरेशन केले होते; मधोमध अर्ध-नारी स्वरूपातील शिव-पार्वतीचे अत्यंत सुबक चित्र होते व बाजूच्या दोन कमळांमध्ये संगीत-वाद्ये दाखवली होती; दुसऱ्या दिवशी त्यामध्ये एका बाजूला नंदी व दुसऱ्या बाजूला सिंहाचे मुखवटे दाखवले होते. मधोमध सिंहासनाच्या डोक्यावर सात फण्यांचा भव्य शेषनाग दाखवला होता. या सर्व सजावटीसाठी



प. पू. श्रीमाताजींसमोर कर्नाटकातील सहजयोग्यांनी आकर्षक नृत्यप्रकार सादर करताना.

पुण्याचे श्री. साप्ते व हैद्राबादच्या कलाकारांनी कौतुकास्पद मेहनत घेतली.

**२३ फेब्रुवारी २००१**

प. पू. श्रीमाताजींचे आगमन सायंकाळी ८ वा. झाले व त्याचवेळी खास बोलावण्यात आलेल्या मिलिटरी ब्रास-बँड पथकाने स्वागतपर गीत व भूप रागातील धून वाजवून श्रीमाताजींना नम्र प्रणाम केला. श्रीमाताजींनीही आनंद दर्शवला. श्रीमाताजी स्थानापन्न झाल्यावर श्री. विजयकुमार गौतम स्वागतपर दोन शब्द बोलले व पुढील सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्र-संचालन श्री. अरूण गोयल यांनी सांभाळले. त्यानंतर भारतातील विभिन्न राज्यातील व परदेशातील सहजयोग्यांनी आपापल्या समूहाचे मानवंदनात्मक चित्ररथ (झाकी) स्टेजसमोरील जागेत सादर केला.

....... सर्वप्रथम प्रमुख अतिथी म्हणून ऑस्ट्रेलियातील सहजयोग्यांच्या ग्रुपने स्वस्तिक-आकारात उभे राहून ठेक्यावर वंदन केले, स्वस्तिक हळुहळु उघडून कुण्डलिनीच्या आकारात आले व पुढे जलद ठेक्यावर हालचाल करीत कुण्डलिनी जागृत होऊन उर्ध्वगामी झाल्याचे दाखवले. ही कल्पना फारच कलात्मक होती.

........ त्यानंतर झारखंडच्या मुला-मुलींनी आकर्षक पेहराव करून त्यांच्या लोकभाषेतील गाणे नाचत-नाचत सादर केले. पाठीमागे एक ग्रामीण देखावा दर्शवणारा चित्ररथ होता.

....... त्यानंतर महाराष्ट्रातर्फे पथकाने (नाशिक युवाशक्ती) लेजीम-नृत्य करीत मानवंदना दिली. त्यामध्ये साधारण पन्नास जणांचा सहभाग होता व बरोबर तुतारी, ढोल, ताशे होते. हे लेजीम-नृत्य जोशपूर्ण व तालात होते.

........ राजस्थानहून आलेल्या सहजयोग्यांनी महाराणा प्रतापचा चित्ररथ केला होता, मिरवणुकीबरोबर राणा प्रताप यांचे मेवाडवासियांना उद्देशून केलेले ऐतिहासिक भाषण वाचून दाखवण्यात आले व राजस्थानी गीत सादर केले.



प. पू. श्रीमाताजींसमोर पूजेनंतर शेवटी सर्व सहजयोगी नृत्य करताना



**प. पू. श्रीमाताजींना मानवरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला सदर पुरस्कार सर्व सहजयोग्यांना सदर पुरस्कार श्री. श्रीवास्तव साहेबांनी दाखवला.**

...... आंध्र-प्रदेशातील मिरवणुकीमध्ये तीस-चाळीस योगी सहभागी झाले होते. त्यांनी एक नृत्यनाटिका सादर केली. त्यामध्ये वेळिपत्रावर लिहिणारा ब्राह्मण व देवी दाखवलेला चित्ररथ होता व मिरवणुकीमध्ये तीन कालाकारांनी श्रीमाताजींच्या स्तुतीपर कीर्तन सादर केले.

........ उत्तर-प्रदेशातून आलेल्या योग्यांनी श्रीकृष्ण व राधा यांचा गोपगोपींबरोबरचा होळी-उत्सव नृत्यगीतामधून सादर केला, बरोबर वेगवेगळ्या रंगांची उधळण करत नृत्य-संगीत असल्यामुळे होलिकोत्सव होत असल्याचा भास होत होता. त्यापाठोपाठ पांढऱ्या रंगाचे कपडे व पाठीवर उघड-झाप करणाऱ्या गुलाबी कमलदलांचा साज केलेल्या मुला-मुलींनी ''महालक्ष्मी नमोस्तुते'' गाण्यासोबत नृत्य सादर केले. कमल-दलांची उघड-झाप ही नृत्य संकल्पना सुंदरच होती. पाठोपाठ 'सत्यमेव जयते' असा सत्ययुगाचा झेंडा घेतलेल्या कलाकारांचे नृत्यपथक व गौतम बुद्ध दाखवलेला चित्ररथ होता.

...... त्यानंतर पांढरे-लाल-पिवळे रंगातील आकर्षक पेहरावातील कर्नाटकामधून आलेल्या योग्यांनी भजन व ग्रुपनृत्य सादर केले तसेच त्यांच्या भाषेमध्ये श्रीमाताजींच्या भाषणाचा भाग वाचून दाखवला.

........ त्यानंतर आलेल्या गुजराथमधील पथकाने महात्मा गांधी व एका आश्रमाची प्रतिकृती असलेला चित्ररथ सादर केला. त्यापाठोपाठ गुजराथी घाटणीच्या रंगी-बेरंगी कपड्यामधील

कलाकारांनी टिपऱ्यांसोबत गरबा सादर केला.

....... त्यानंतर तामिळनाडूमधील कलाकारांनी पारंपारिक अश्वनृत्य व मयूरनृत्य सादर केले. साथीला १०-१२ फूट उंचीचे पारंपारिक स्तंभ उंचावत नृत्य पण होते.

........ त्यानंतरच्या पश्चिम बंगालचा महाकालीची प्रतिकृती दाखवलेल्या चित्ररथासोबत नृत्यपथक आले व नृत्यामधून 'वंदे मातरम्' सादर केले. त्यावेळी स्वतः श्रीमाताजी व संपूर्ण योगीजन उभे राहिले होते.

हा मानवंदना पथकांचा आकर्षक कार्यक्रम आटोपल्यावर Indian Council of Management Executive या संस्थेकडून श्रीमाताजींना देण्यात आलेला ''मानव-रत्न'' पुरस्कार जाहीर करण्यात आला; तो पुरस्कार व पदक घरमशालेचे संचालक श्री. कौल यांनी श्रीमाताजींना अर्पण केला.

त्यानंतर दक्षिण भारतातील सुप्रसिद्ध व्यावसायिक कलाकारांनी शिव-संदर्भात नृत्यप्रकार व्यासपीठावर श्री माताजींच्या समोर सादर केले. श्रीमाताजींनी त्या सर्व कलाकारांना आशीर्वाद दिले.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचे शेवटी सुप्रसिद्ध कलाकार पंडित शिव प्रसाद यांनी Whistle wizard (शीळ वादन) सादर केले. शीळेवर त्यांनी राग हंसवती, दुर्गा, यमन व शेवटी 'विश्ववंदिता' सादर केले. त्यांच्या साथीला सतार, व्हायोलिन, तारवाद्य, मृदुंगम्, तबला इ. संपूर्ण पथक होते.

**२४ फेब्रु. २००१**

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचाल श्री. अरूण प्रधान यांनी केले. कार्यक्रमाची सुरूवात बेंगलोरमधील व्यावसायिक संगीत कलाकारांनी सादर केलेल्या ''लय-तरंग'' या कार्यक्रमाने झाली. त्यात निरनिराळी वाद्ये होती व प्रत्येक कलाकाराने आपले वैशिष्ट्यपूर्ण कसब दाखवले. त्यानंतर तामिळनाडूमधील सुप्रसिद्ध कलाकार श्रीमती पार्वती घंटशाला यांनी पेरिनी शिवतांडव नृत्यामधून शिव-कथा सादर केल्या. त्यानंतर सुप्रसिद्ध कलाकार पद्मश्री श्रीमती एन्. राजम् यांचे व्हायोलीन वादन झाले. सुरवातीला बागेश्री राग वाजवल्यानंतर त्यांनी श्रीमाताजींच्या आवडीचा बनारसी दादरा सादर केला व अखेरीस ''पायोजी मैने राम रतन धन पायो'' हे भजन वाजवले.



सहजयोग साहित्याचे वेगवेगळे स्टॉल्स

अशा तऱ्हेने ह्या कायम लक्षात राहण्यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता झाली.

**२५ फेब्रु. २००१**

आजचा पूजेचा व महत्त्वाचा दिवस असल्यामुळे गर्दी जास्तच वाढली. एकूण उपस्थित सुमारे नऊ हजारच्या आसपास होती. स्टेजवर फुलांची प्रचंड आरास होती व त्यामध्ये त्रिशूळ व डमरू पण होते.

श्रीमाताजींचे आगमनाचे आधी संजय तलवार यांनी गायलेल्या 'सहज की धारा मे हम अमृत पीते है'' या भजनाने, ऑस्ट्रेलियातील कलाकारांनी म्हटलेल्या ''जय बोलो भंडारी'' व श्री. सुब्रमण्यम यांच्या 'शिवोऽहं शिवोऽहं' या भजनामधून वातावरण निर्मिती केली गेली. सुरुवातीला पुण्याचे श्री. राजेंद्र बागदडे यांनी अत्यंत सुंदर सुमधुर बंदिशी सादर केल्या. त्यानंतर श्रीमाताजींच्या आगमनापाठोपाठ श्री. अरूण आपटे यांनी म्हटलेल्या यमनकल्याण रागातील 'दर्शन देओ शंकर महादेव' बंदिशीमुळे वातावरण एकदम चैतन्यमय झाले.

श्री माताजींनी शिव-पूजेच्या भाषणात महादेवांचे गुणगान, सहजयोग्यांसाठी त्यांच्या गुणांचे महत्त्व व सहजयोग्यांची शिवकृपा मिळवण्याबद्दलची जबाबदारी या संदर्भात अनमोल मार्गदर्शनपर उपदेश केला. सविस्तर भाषण याच अंकात वेगळे दिले आहेच. गणेश-पूजा, शिव-पूजा व देवीपूजा असा पूजेचा कार्यक्रम यथासांग पार पडला.

श्री. अरूण व सौ. सुरेखा आपटे यांनी ''उमा उमा शिव-शंकर'' ही भैरव रागातील बंदिश सादर केली व पूजेच्या चैतन्यप्रवाहामध्ये येण्यास सर्व उपस्थितांना मदत झाली. ऑस्ट्रेलियाच्या योग्यांनी 'शिव शिव शंभु बम बम बम' व 'शिव भोला भंडारी' ही भजने म्हटली.

श्रीमाताजींच्या समोर सर्वांनी अत्यानंदाने नाच केला, **कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजन व नियोजनाबद्दल श्री. राजेंद्र पुगालिया यांचा श्रीमाताजींच्या हस्ते सत्कार झाला.**

सर्व सहजयोग्यांना व्हायब्रेटेड कुंकु, तीर्थ व प्रसाद त्याचबरोबर ''शिवपुजा'' ही पुस्तिका यांचे वाटप करण्यात आले.

●●●

झाकीतील काही आकर्षक देखावे






उत्तर प्रदेश सहजयोग्यांनी सादर केलेल्या देखाव्यातील काही क्षणचित्रे





तामिळनाडू सहजयोग्यांनी सादर केलेला देखावा व सहज मंदिराची प्रतिकृती असलेला चित्ररथ



आंध्र प्रदेश सहजयोग्यांची नृत्यनाटिका सादर करताना



राज्यस्थान सहजयोग्यांनी सादर केलेला महाराणा प्रताप देखावा

# प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी यांना मानवरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यासंदर्भात स्थानिक वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या

सकाळ दि. २६. २. २००१

## माताजी निर्मलादेवी यांना 'मानव रत्न पुरस्कार' अर्पण

पुणे, ता. २५ : 'सहजयोगा'च्या संस्थापक माताजी निर्मलादेवी यांना इंडियन कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट एक्झिक्युटिव्ह यांच्या वतीने 'सहजयोगातील मानव रत्न' पुरस्कार, 'मातृश्री' हे सन्मानपत्र व सुवर्णपदक अर्पण करण्यात आले.

बालेवाडीतील छत्रपती शिवाजी क्रीडा संकुलात झालेल्या एका सुरेख समारंभात धर्मशाळा येथील इंटरनॅशनल सहज पब्लिक स्कूलचे संचालक एस. एन. कौल व त्यांच्या पत्नी डॉ. विली कौल यांनी निर्मलादेवींना पुरस्कार अर्पण केला.

या वेळी त्यांच्या विविध प्रांतातील भक्तांनी आपापल्या प्रदेशातील लोकनृत्ये सादर केली. सहजयोगाची शिकवण देणारी व निर्मलादेवी यांची स्तुती करणारी ही लोकनृत्ये होती.



पुढारी २६.२.२००१

## श्री माताजी निर्मला देवी यांना मानवरत्न पुरस्कार

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) : सहजयोगाच्या उद्गात्या श्री. माताजी निर्मला देवी यांना नुकताच मानवरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सहजयोगाच्या माध्यमातून हजारो जणांना आत्मसिद्धीचा अनुभव देणाऱ्या माताजींचा इंडियन कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट एक्झीक्युटीव्हच्या (आयसीएमइ) वतीने 'मातोश्री' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

माताजींनी स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींच्याबरोबर काम केले. आत्मसिद्धीसाठी सहजयोगाच्या देशात सध्या शाखा सुरू आहेत. १९८९ मध्ये त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाचा शांती पुरस्कार देण्यात आला होता.

आज का आनंद २४.२.२००१

## माताजी निर्मला देवी 'मानवरत्न' पुरस्कार व 'मातोश्री' सम्मान से सम्मानित



पुणे, 23 फरवरी (आप्र)

'सहजयोगा' की संस्थापिका एवं सुप्रसिद्ध धर्मगुरु श्री माताजी निर्मला देवी को 'दि इंडियन कौन्सिल आफ मैनेजमेंट एक्जीक्यूटिव (आईसीएमई) व 'स्पेशल एक्जीक्यूटिव मैजिस्ट्रेट सोसायटी' द्वारा 'मानवरत्न' पुरस्कार से सम्मानित किया गया। उन्हें 'मातोश्री' के सम्मान से भी नवाजा गया।

बालेवाडी क्रीडा ग्राम में आयोजित एक शानदार कार्यक्रम में माताजी निर्मलादेवी ने सहजयोगा के माध्यम से प्रतिपादित किया कि, 'हमें अपने भीतर की ऊर्जा शक्ति को स्वयं ही जागृत करना है। सुख-शांति हमारे भीतर ही छिपी होती है।'

माताजी निर्मलादेवी ने अपने प्रारंभिक जीवन में महात्मा गांधी द्वारा शुरु किए स्वतंत्रता संग्राम में भी भाग लिया था। उनके द्वारा शुरू की गई 'सहजयोगा' प्रणाली विश्वभर के 80 से अधिक देशों में अपनाई जाती है। उनके सहजयोग से विश्वभर के कई देशों के लोगों ने अध्यात्मिक लाभ उठाकर अपना जीवन सफल बनाया है।

सामना ३०.३.२००१

# 'सहजयोग' : जगातील सर्वाधिक उच्चप्रतीचे कार्य

भूकंप झालेल्या भूकंपात सहजयोग्यांना काही इजा झाली नाही. त्यांच्या घराला तडासुद्धा गेला नाही. आपल्याला जग बदलायचे आहे. आपण सूज्ञ व्हायला हवे. कुंडलिनी जागृतीने मेंदू प्रकाशित होईल, तेव्हाच ते शक्य होईल. कारण जग विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे. गुजरातमधील भूकंप हे त्याचेच एक उदाहरण आहे. आज माणूस भ्रष्टाचार, पैसा यामध्ये गुरफटून गेला आहे. माणूस पूर्णपणे नीतिमत्ता विसरला आहे. एवढ्यासाठी त्याने आधुनिक काळात सर्वव्यापी शक्तीला कार्यान्वित केले पाहिजे. आधुनिक जगात आपण जे काही करतो ते सापेक्ष असते व प्रत्येक गोष्ट सापेक्षतेच्या मर्यादांच्या मध्येच कार्यान्वित होते. या सापेक्षतेत सीमित झालेल्या कार्याचे परिणाम त्रिकालबाधित असत नाही. त्रिकालबाधित ज्ञान फक्त आत्म्यापासून मिळते. हे मान्य करण्याची बुद्धिवाद्यांची इच्छा नाही. प्रत्येकासाठी ते काहीतरी पर्याय शोधून काढतात. बीजाने अंकुरित व्हायला हवे तसे कुंडलिनी जागृत होणे आवश्यक आहे.

'काही बुद्धिवाद्यांची समस्या दुसरी आहे. ते शोधक आहेत म्हणून जणू काही सतत शोधतच राहणार आहेत. या लोकांनी ध्यानात घ्यायला हवे की, आता शोधणे थांबवून अंतर्मुख होण्याची वेळ आली आहे. परमेश्वर त्यांच्यासमोर उभा ठाकला तरी ते त्याला म्हणतील, 'आम्ही परमेश्वराला शोधत आहोत. तुम्हाला परमेश्वराविषयी काही ज्ञान आहे का ?

श्री माताजी निर्मलादेवी यांचे सहजयोगावरील प्रवचन पुण्यात नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या सोहळ्यात माताजींना 'इंडियन कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट एक्झिक्युटिव्ह ऑफ महाराष्ट्र' या संस्थेच्या वतीने 'मानवरत्न' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून तसेच ६५ देशांतील दहा हजार प्रतिनिधी सोहळ्यास उपस्थित होते. यावेळी माताजींनी केलेला उपदेश.



एक ना एक दिवस अशा बुद्धिवादी लोकांच्या हे लक्षात येईल की, सहजयोगात येणे केवळ हिताचेच नाही, तर सर्व जगाच्या हिताचे आहे. हिंदुस्थान एक प्राचीन देश आहे. अनेक संतांचे व द्रष्ट्यांचे आशीर्वाद त्याला लाभले आहेत. जगात स्वतंत्र झाला तसा या संतांनाही धर्ममार्तंडांचा छळ सोसावा लागला. बाराव्या शतकात श्री ज्ञानेश्वरांचा अवतार झाला. त्यांचे जीवन केवळ वीस वर्षांचे होते. आपले थोरले बंधू व गुरू निवृत्तीनाथ यांच्या परवानगीने त्यांनी सहाव्या अध्यायात कुंडलिनीविषयी स्पष्ट लिहिले आहे; पण धर्ममार्तंडांनी त्याला विरोध केला.

प्रत्येक माणसाच्या हृदयात आत्म्याचे म्हणजे परमेश्वराच्या प्रतिबिंबाचे वास्तव्य असते. कुंडलिनी प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्तावस्थेत आहे. एकदा ती जागृत होऊन सर्वव्यापी शक्तीशी संलग्न झाल्यावर चेतना विकसित होते. हे ज्ञान परमेश्वरापासून येते. ज्याच्याविषयी शंका घेऊन आव्हान देता येत नाही. असा ज्ञानाचा निरंतर व अविनाशी प्रवाह आहे. या ज्ञानाचा पडताळा घेता येतो व ते सिद्ध करता येते. आत्म्याच्या प्रकाशामुळे संवेदनशीलता मिळते. त्या संवेदनेमुळे खरे आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व खरे कोणते व खोटे कोणते हे अंतर्यामी लक्षात येईल. कुंडलिनी परीक्षक आहे व निर्णय देणार आहे व त्यानंतरच आत्मसाक्षात्कारी कोण व इतर कोण अशी निवड होईल.

म्हणूनच या नवीन युगाला 'ॲक्वेरीयस' युग असे म्हणाले आहे याचा अर्थ पवित्र जलाने भरलेला कुंभ.

त्यानंतर सत्ययुग येणार आहे. आपण आत्मसाक्षात्कार मिळवून त्यात प्रस्थापित होऊन सर्वव्यापी शक्तीशी सतत संलग्न राहिले पाहिजे. पैसा, राष्ट्रीयत्व, वय वगैरे कशाचाच त्याच्या कार्यक्षमतेत अडथळा येत नाही.

तेव्हा प्रश्न हा राहतोच की, लोकांना कसे पटवून द्यायचे. या जिवंत क्रियेला पूर्वीच प्रारंभ झाला आहे. अनेकांच्यात त्याचे परिणाम दिसत आहेत त्याला पर्याय नाही व त्यांनी सहजयोगी व्हावे.

सहजयोग इतका विशेष शोध आहे की, सहजयोगात महान सेन्सेशन आहे. पण लोकांना पैसा मिळवायचा असल्याने ते बीभत्स गोष्टींना जास्त महत्त्व देतात. सहजयोगाचे कार्य फार प्रचंड मोठ्याने आहे. आतापर्यंत जगात कोणत्याही क्षेत्रात झालेल्या कार्यपेक्षा हे कार्य अधिक उच्चप्रतीचे आहे. आपण सत्याला, सद्गुणांना व आपल्या आदर्शांना धरून राहायला हवे.

सहजयोग सामूहिकतेत कार्य करतो व सामूहिक मार्गाने त्याचा प्रत्यय येतो. प्राचीन काळात एक किंवा दोन साक्षात्कारी व्यक्ती असत व त्यांनी वैयक्तिकरीत्या साक्षात्कार मिळवलेला आहे. आजच्या आधुनिक काळात समष्टीच्या पातळीवर साक्षात्कार देण्याची पद्धत श्रीमाताजी निर्मलादेवी यांनी शोधून काढल्यामुळे सामूहिक पुनरुत्थानाच्या या काळात व्यक्ती सामूहिक नसेल, तर त्याची आध्यात्मिक वाढ होणार नाही.

– बलभीम जाधव



# माता निर्मला देवी को मानव रत्न पुरस्कार

नवभारत टाईम्स २७.२.२००१

पुणे, 26 फरवरी, सं. माता निर्मला देवी को विश्व में भारतीय ज्ञान योग की विधा सहजयोग को व्यापक पैमाने पर प्रसार-प्रचार के लिए इंडियन कौंसिल ऑफ मैनेजमेंट एक्झीक्यूटिव मुंबई की ओर से मानव रत्न पारितोषिक से अलंकृत किया गया है. मैनेजमेंट एक्जीक्यूटिव (आईसीएमई) के प्रतिनिधि के. कौल द्वारा प्रदान किया गया है.

वालेवाडी में 23 से 25 फरवरी के मध्य सहजयोग के संदर्भ में एक कार्यक्रम आयोजित किया गया. इस कार्यक्रम में माता निर्मला देवी द्वारा विश्वस्तर पर संचालित सहजयोग केन्द्र जिसकी विश्व के 80 देशों में शाखाएं हैं के लगभग 8 हजार सदस्यों ने भाग लिया, जिसमें 500 लोग विदेशों के सम्मिलित थे. तीन दिन तक चले इस सहजयोग शिविर में अनेक कार्यक्रम सम्मिलित हुए, जिसमें सांस्कृतिक, ध्यानयोग, शारीरिक, भावनात्मक एवं कुछ अन्य गतिविधियां सम्मिलित थीं. 30 वर्ष पहले माता निर्मला देवी द्वारा सहजयोग का कार्यक्रम शुरू किया गया था जो आज विश्वस्तर पर अपनी एक अलग पहचान बना चुका है. भारत की इस विधा को भारत से अधिक दुनिया के अन्य लोगों ने पूरी गंभीरता के साथ आत्मसात किया है. इसमें कुंडली जागरण करके घातक बीमारियों को भी दूर किया जा सकता है. इन्हीं मूल विषयों पर ...

इंडियन कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट एक्झिक्युटिव्ह (आय.सी.एम.ई) या संस्थेतर्फे श्रीमाताजी निर्मलादेवी यांना 'मानवरत्न' किताब देऊन बालेवाडी येथील क्रीडा संकुलात गौरविण्यात आले.

लोकमत २५.२.२००१

पुणे टाईम्स २६.२.२००१



Mataji Nirmala Devi

# The saint and her YOGA

Chattrapati Shivaji sports stadium in Balewadi on Saturday, to catch a glimpse of holiness, as embodied in the person of spiritual leader Mataji Nirmala Devi, founder of the Sahaja Yoga movement.

Mataji was in the city to receive the 'Manav Ratna' award and the title of 'Matoshri', courtesy the Indian Council of Management Executives (ICME). Speaking on the occasion, the modern-day saint threw light on the importance self-realisation has for an individual, as well as for collective consciousness.

Born in March 21, 1923, in Chindwara, Mataji originally discussed the principal of Sahaja Yoga with Mahatma Gandhi and said that he was in agreement that, "We must unite the essence of all religions and overcome artificial boundaries of fundamentalism."

In 1970, Mataji, after spending half her life meditating, succeeded in developing a method by which the residual energy in man could be awakened *en masse*. This method of self-realisation has become

**Mataji Nirmala Devi felicitated by Indian Council of Management Executives**

known as Sahaja Yoga.

"It utilises the subtle inner instrument, which exists within every one of us, to bring about a balance in our physical, mental, emotional and spiritual beings. This subtle instrument is known as the primordial energy and lies dormant until it is awakened, after which it rises through the seven *chakras*, exits the body from the top of the head and unites with the universal and cosmic energy. This energy soothes, heals and corrects the central nervous system," explains Shubrajit, a Sahaja yogi.

According to Dr Umesh Rai, director of the International Sahaja Yoga Research and Health care centre, "Stress is reduced, talents are rediscovered, there is clarity of thought, focus of attention, healing of diseases, reduction of blood pressure and tension. The ability to be one's own master are the effects of this form of yoga."

— **Kaushik Chakravort**

---

पुणे हेरॉल्ड २५.२.२००१

**Mata Nirmala**

## Manav Ratna

**By our staff reporter**

MATA Nirmala Devi said that the State that is achieved through self realization is first



Nirmala Devi

called 'thoughtless awareness'. She was speaking after being felicitated with the Manav Ratna award and the title of 'Matoshri' by the Indian Council of Management Executive (ICME). The program was organised at the Chattrapati Shivaji Sports Complex by ICME on Feb 23.

Through the practice of Sahaja Yoga, Mataji has introduced self realization to thousands who have attended her lectures all over the world. Sahaja Yoga utilises the subtle inner instrument, which exists within each one of us to bring about a balance in our mental discipline.

In 1970, Mataji after half a lifetime of meditation and experimentation, succeeded in developing a method by which the residual spiritual energy in man could be awakened enmasse. This method of self realization has become known as Sahaja [illegible]

# श्री आदिगुरू दत्तात्रेयांची दहा अवतरणे

## राजा जनक

..... राजा जनक हा राजा निमीच्या वंशावळीमधील राजा हृस्वरोम याचा पुत्र. या घराण्यातील सर्वच राजे विद्वान व गुणसंपन्न होते. वसिष्ठमुनींनी रचलेल्या 'योग वशिष्ठ' ग्रंथामध्ये जनकराजाला सिद्ध पुरूषांनी गायलेल्या भजनांमधून साक्षात्कार मिळाल्याचा उल्लेख आहे. ती भजने 'सिद्धगीता' या नावाने ओळखली जातात. त्यामध्ये सांसारिक जीवनामधील सामान्य व्यवहारामधील फोलपणा व त्यातून पार पडण्याबद्दल उपदेश आहे; त्याचबरोबर चित्तनिरोध साधून विदेही अवस्था मिळवण्याबद्दल मार्गदर्शनही केले आहे.

जनकराजा विदेही होता; विदेही व्यक्तीचे चित्त सदैव आत्म्याकडे असते; तो सर्व काही करत असल्यासारखा दिसत असला तरी काहीच करत नसतो; कर्तव्यपूर्तीची फळे मिळूनही तो विचार, भावना, जन्म-मृत्यू, भूत-भविष्य इ. च्या पलीकडे पोचलेला असतो. यालाच 'सहजानंद' वृत्ति म्हणतात.

'देवी भागवत'मधे उल्लेख आढळतो की वेद-व्यासांनी आपला मुलगा 'शुका'ला गृहस्थाश्रम न घेताच संन्यास घेण्यापासून परावृत्त करण्यासाठी जनकराजाकडे पाठवले. राजा जनकाने शुकाला समजावले की

''अपरिपक्व योगस्थितीमध्ये इंद्रियदमन करून वासनांवर काही काळ ताबा ठेवता आला तरी ती क्षमता फार काळ टिकत नाही. संन्यासाश्रम घेतल्यावर जर हे नियंत्रण सांभाळणे जमले नाही तर त्याची काय अवस्था होते हे बघ; तो अधोगतीकडेच जातो. कारण चविष्ट भोजन, ऐषारामाची सवय, तऱ्हेतऱ्हेचे उपभोग या सर्व वासना अधोगतीकडेच नेणाऱ्या आहेत आणि त्यांचे जाळे एकदम तोडणे कठीण काम असते. म्हणून ते जाळे हळु-हळु तोडणेच श्रेयस्कर असते. उंच आसनावर झोपलेला माणूस झोपेत खाली पडू शकतो पण जमिनीवर झोपणाऱ्याला ती भीति नसते. त्याचप्रमाणे सन्यासाश्रमाचा उच्च धर्म स्वीकारल्यावर जर पाय घसरला तर त्या साधकाला पुन्हा मार्गावर येणे अशक्य असते. माणसाचे मन ताब्यात ठेवणे ही सोपी गोष्ट नाही. म्हणूनच ज्याचे मन परिपक्व झाले नाही त्याने सर्वच एकदम मिळवण्याचा प्रयत्न न करता एकेक वर्णाश्रमांत पारंगतता मिळवणे प्रगतिपथावर राहणे श्रेयस्कर आहे. स्थितप्रज्ञ व सूज्ञ माणूस यशापयश एकाच मापाने स्वीकारत असतो, सुखाने नाचत नाही तसेच दुःखाने निराश होत नाही, त्याचबरोबर कर्तव्य पार पाडण्यात कुचराई करत नाही. असा माणूस संसारात राहूनही आत्मसाक्षात्कारास पात्र बनतो व सरतेशेवटी मुक्त होतो.''

पुढे शुकाने जनकाला विदेहीचा अर्थ विचारल्यावर जनक म्हणाले,

''संसारी माणूस संन्यास घेऊन जंगलात आला तरी मनाने घर, कुटुंब, पैसा, अन्न आणि असुरक्षितता यांच्यातून जर मुक्त झाला नाही तर त्याचे मन व ज्ञान विकल्परहित होत नाही. माझ्या मनात असले विकल्प कधीच उमटत नाहीत, म्हणून मी सदैव प्रसन्न असतो. माझ्याजवळ अगणित जडजवाहिरे आहेत पण ते माझे नाहीतच. सुख-दुःखाचा कसलाही प्रसंग वा संकटे आली तरी माझ्यावर कसलाच परिणाम होत नाही. उद्या मिथिला नगरीला आग लागली तरी त्यात माझे असे काहीच भस्मसात होणार नाही. या जगातील कुठल्याही गोष्टींचे मला बंधन नसल्यामुळे मी जेवतो आणि शांतपणे झोपतो. हा देह मी आहे असे वाटणे हा बंध आहे तर देह म्हणजे मी नव्हे ही मुक्ति आहे.''

●●●

### मुहम्मद पैगंबर

''माझ्या उजव्या हातावर सूर्य आणि डाव्या हातावर चंद्र जरी तुम्ही आणून ठेवलेत तरी मला नकोत. एक अल्ला शिवाय मला काहीच श्रेष्ठ नाही.''

# शिव-पूजा पुणे २००१ काही क्षणचित्रे



प्रसाद आणि गिफ्ट डिस्ट्रीब्युशन करताना



डॉक्टरांचा ट्रिटमेंट कँप



रजिस्ट्रेशन काऊंटर



अनाऊंसमेंट काऊंटर




फॉरिनर्ससाठी एन्क्वायरी काऊंटर





भोजन व्यवस्था



सिक्युरीटी काऊंटर



ट्रान्सपोर्ट काऊंटर





एन. एस . वाय. एस. व चैतन्य लहरी रजिस्ट्रेशन काऊंटर

# दीपावली पूजा

लॉस एंजलीस
२९ ऑक्टोबर २०००

आज दिवाळी पूजा अमेरिकेत होत आहे, आजचा हा महान, सर्व जगाकरिता महत्त्वाचा असा दिवस आहे. येथे येऊन लोकांनी भरपूर धन प्राप्त केले आहे पण त्याच पैशाने लोकांना नेस्तानाबूतही केले आहे. आज आपण दीपावलीबद्दल बोलतो. अनेक दिवे येथे पाहतो, त्यांचे अनेक प्रकार दिसतात व लक्ष्मी जी जलतत्त्वातून निघाली व पाण्यात उभी आहे याबद्दल पाहू या. श्री लक्ष्मी जी पाण्यात उभी आहे, ही मानवाच्या वैभवाचे द्योतक आहे. प्राण्यांच्या बाबतीत ते लागू नाही कारण त्यांना मर्यादा आहेत. माणसाची भरभराट होऊ शकते पण त्याने मर्यादा ठेवल्या नाहीत तर त्याची विनाशाकडे वाटचाल होऊ शकते. बाहेर हा जसा प्रकाश आहे व लक्ष्मी प्रसन्न आहे तसाच प्रकाश मानवाच्या आत दिसला पाहिजे. त्याला साक्षात्कार मिळाला पाहिजे व तो त्याने दुसऱ्यालाही दिला पाहिजे, दुसऱ्यालाही प्रकाशित केले पाहिजे. पण जेव्हा ते लक्ष्मीला प्राप्त करतात तेव्हा पूर्ण आंधळे होतात आणि या लक्ष्मीतत्त्वाच्या मागे काय आहे हे विसरतात. लक्ष्मीतत्त्व हे उदारतेचे प्रतीक आहे. ज्याच्याकडे पैसा आहे ती व्यक्ती अतिशय उदार असावयास हवी, एका हाताने ती दुसऱ्याला दान करत असते. मानवातील कंजूषपणा हा त्या लक्ष्मीतत्त्वाच्या विरुद्ध आहे. मग त्याला लक्ष्मीचे आशिर्वाद लाभत नाही आणि हळूहळू तो गरीबीकडे झुकतो. ज्यावेळेला तुम्ही डाव्या हाताने देत जाता त्यावेळेला तुम्ही त्या लक्ष्मीला दरवाजा उघडता असे समजा. नंतरच तिची कृपा प्राप्त होते. ती अशी कृपा आहे त्यामुळे ज्यांच्याकडे लक्ष्मी आहे ते दुसऱ्यांना अभय देतात, संरक्षण देतात, अशा लोकाना जे दीन आहेत, ज्यांची छळवणूक होते, अनाथ मुले इ. ना ही सर्व तुमच्या उजव्या हाताची किमया आहे. हेच ते लक्ष्मीतत्त्व होय. मागील जे दोन हात आहेत, त्यात गुलाबी कमळ घेतलेले दिसेल. गुलाबी रंग हे प्रेमाचे प्रतीक आहे, तुमच्या हृदयात प्रेम व दया असायला हवी.

तसेच ज्याच्याकडे लक्ष्मी आहे त्याचे घर सर्वांकरीता खुले असते. कमळ सर्व कीटकांना आकर्षित करते, विशेषत: भुंगा. ज्याला काटे असतात, त्यालासुद्धा आश्रय देते. रात्रभर तो सुरक्षित मजेत झोपतो, झाकलेल्या कमळात. याप्रमाणे लक्ष्मीपतीचे घरात सर्व पाहुण्यांचा आदर सत्कार झाला पाहिजे. जणू ते कोणी देवलोकच आहेत. काही गरीब लोकही श्रीमंतांपेक्षा अधिक पाहुणचार करतात असे दिसून येते. हे काही देशांच्या बाबतीतही लागू होते. श्रीमंत देशांत लोकांना येण्यासाठी अनेक प्रतिबंध दिसतात. त्या मानाने गरीब देश अधिक पाहुणचार करतात. असे श्रीमंत देश त्या लक्ष्मीतत्त्वाच्या विरोधात वागतात.

आणखी महत्त्वाची खूण म्हणजे ती एका कमलपुष्पावर उभी असते. पूर्णपणे संतुलित व कोणताही भार न देता. जे देश श्रीमंत आहेत ते मात्र गरीब देशावर आपली सत्ता लादतात, सत्ताधारी होतात. सर्व काही सत्तेभोवती केंद्रित होते. याच्यात काहीही ईश्वरी तत्त्व नसते. केवळ त्यात आक्रमकता, छळवणूक व स्वत:चे महत्त्व वाढवायचे असते आणि लक्ष्मीतत्त्वाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर ते अगदी विरुद्ध वागतात असे दिसते. कारण एकच की त्यांना आत्मप्रकाश मिळालेला नाही. त्यांचे हृदय प्रकाशित नाही. दिवाळीत जसा प्रकाश दिसतो तसा तो त्यांच्या आत दिसला पाहिजे. याच्या अभावानेच असे लक्ष्मीपती म्हणणारे मूर्खतेकडे वळतात. लक्ष्मतत्त्वाचा पूर्व अभाव दिसतो. म्हणून आत्मप्रकाशाची जरुरी आहे. त्याशिवाय लक्ष्मीतत्त्व पूर्णपणे उमजत नाही.

सहजयोगात लक्ष्मीतत्त्व, महालक्ष्मीतत्त्व बनते. माणूस अजून उन्नत होतो. महामानव होतो म्हणजेच ती महालक्ष्मी होते. ज्यामुळे तुमच्याकडे जे काही आहे त्यात तुम्ही पूर्ण समाधानी होता. नुसते धन नाही किंवा अधिक मोटारी नाही, पण मला इतर काही प्राप्त करायचे आहे त्यामुळे मी अधिक समाधानी होईन. अर्थशास्त्राचा एक नियम आहे की माणूस कधीच समाधानी राहू शकत नाही. एक संपले की दुसऱ्याचा हव्यास सुरु होतो. पण जेव्हा महालक्ष्मी तत्त्व तुमच्यात प्रकाशित होते तेव्हा तुमचा हव्यास संपतो. जे काही आहे ते तुम्ही दुसऱ्याला देऊ करता, तुम्हाला देण्यात आनंद मिळतो. ही उदारता हेच दर्शविते की तुम्ही लक्ष्मीकडून

महालक्ष्मीतत्त्वाकडे जाता. ही पहिली खूण आहे. जेव्हा लक्ष्मीतत्त्वावर तुम्ही असता त्यावेळेला आंधळे असता अधिकाधिक मागत असता. पण जेव्हा तुम्हाला प्रकाश मिळतो, तुमची उदारता, दुसऱ्याचे रक्षण, पाहुणचार व दया या चार गोष्टीतून तुम्ही वर येता. तुमच्या विचारांना नवी दिशा मिळते आणि जेव्हा त्याचा सामूहिकतेतून प्रभाव वाढतो, ते नव्या क्लृप्त्या काढून लोकांकडून कसा पैसा मिळवावा याचा विचार करतात. हा एक मोठा उद्योग चालू होतो यातून अनेक लोक बुडतात. सर्वनाश ओढून घेतात आणि मग अनैतिकतेच्या जाळ्यात अडकतात अशारीतीने लक्ष्मीतत्त्व नीटपणे समजले गेले नाही तर तुम्ही महालक्ष्मीतत्त्वाला कसे प्राप्त होणार?

या महालक्ष्मीतत्त्वाला जाणलेले नवे व्यक्तीमत्त्व, मग विचार करेल की या पैसे उकळण्याच्या उद्योगातून काही प्राप्त होणार नाही. तुमच्या हृदयातील प्रकाश तुम्हाला महालक्ष्मीचा मार्ग दाखवेल. नाहीतर तुम्ही भरकटत बसाल. पण महालक्ष्मीतत्त्वावर आलात की तुम्ही असे मार्ग शोधाल की ज्यातून तुम्हाला पूर्ण समाधान मिळेल. अमेरिकेत एवढे श्रीमंत लोक असूनही त्यांच्यात बरेच साधक लोक आहेत.

मी जेव्हा पहिल्यांदा अमेरिकेला भेट दिली तेव्हा असे दिसले की येथे महालक्ष्मीतत्त्व असूनही लोकांनी नेमके काय साधले पाहिजे हे त्यांना समजले नव्हते, त्यामुळे ते अगुरुंच्या नादी लागले. ठार वेडे झाले. अगुरु जे लक्ष्मीचेच गुलाम बनले अशांच्या नादी लागले. अशारीतीने ते वाटेल तेथे भरकटत होते. अशा लोकांसाठी काहीतरी केले पाहिजे असे मला वाटले. गेले नऊ वर्षे मी त्यांच्यासाठी काहीही करू शकले नाही याबद्दल दुःख वाटते; पण ते चुकीच्या मार्गाने चालले होते. नेमके आपण काय प्राप्त केले पाहिजे हे त्यांना समजत नव्हते. सर्व काही गोंधळाचे होते. जगाचे हे सत्ताधारी लोक कुठे चाललेत काही समजेना.

अमेरिकेत तशा महान व्यक्ती होऊन गेल्या, अब्राहम लिंकन, जॉर्ज वाशिंग्टन या महान व्यक्तीत महालक्ष्मीतत्त्व जाणवत होते. पण नंतर ते विसरुन जगावर अधिकाधिक सत्ता कशी गाजवायची, याच्या मागे लागले. पैशाच्या जोरावर सत्ता गाजवायची लोकांना नाचवायचे, या जोशात तेच विनाशाच्या मार्गाकडे झुकले. कुटुंबसंस्था उध्वस्त झाली. कारण लक्ष्मीतत्त्वाच्या चुकीच्या कल्पनांमुळे स्त्रियाही घटस्फोटातून पैसे मिळवू लागल्या. त्यात कसलीच लाज राहिली नाही. पैसे मिळविण्याचा एक उत्तम मार्ग, असे त्या समजत होत्या कारण त्यांच्यात आत्मप्रकाशाचा अभाव होता. त्यानंतर ड्रग्ज व मद्याची नशा मागे लागली. केवढा अधःपात, केवढा अंधार. सर्व बुद्धी पैसा मिळवण्याच्या धंद्याने ग्रासली होती. पैशाबरोबर इतर आवडीनिवडीही वाढल्या, ज्याला काहीही अर्थ नाही. सर्व मूर्खपणाचे. अशा स्थितीत त्यांना कसे पटवायचे, उज्ज्वल आयुष्याबद्दल कसे सांगायचे हा प्रश्नच होता. महालक्ष्मीतत्त्वाचे व्यक्तीत्व कसे घडवायचे हा प्रश्न होता. अशा लोकांना इतर लोकांनी कितीही लुबाडले, फसवले तरी त्यांची महत्ता कमी होऊ शकत नाही. महालक्ष्मीतत्त्वाचे काही फायदेही होतात तर ते प्रस्थापित होणे आवश्यक आहे कारण जेव्हा महालक्ष्मीतत्त्व प्रस्थापित होते तेव्हा त्या व्यक्तीत लक्ष्मीची नऊ तत्त्वे प्रकाशमान होतात व ती पूर्णपणे प्रतीत होतात (नवधा लक्ष्मी). गृहलक्ष्मी हे त्यातील एक महत्त्वाचे, म्हणजेच तिचे कुटुंब. पत्नीवरच ही जबाबदारी असते. ती सूज्ञ असते, तिला तिची जाणीव असते, कधीही प्रतिक्रिया व्यक्त नाही. ती मुलांचा यथायोग्य सांभाळ करत त्यांना वाढवते. पण तिच्यात गृहलक्ष्मीतत्त्व प्रकाशित नसेल तर ती गर्विष्ठ होते व पुरुषाप्रमाणे वागते. तिला तिची नोकरी महत्त्वाची वाटते, बँक बॅलन्स महत्त्वाचा वाटतो. पण तिची खरी ठेव म्हणजे तिचे कुटुंब व तिची अपत्ये.

स्त्रियांनी जाणले पाहिजे की सर्वांना प्रेम देणे हीच तिची जबाबदारी आहे. लक्ष्मी व इतर शक्त्या या सर्व देवता आहेत आणि ते भक्तावर प्रेमाचा वर्षाव करतात. त्यांचे काही स्वभाव विशेष आहेत, गुण आहेत. तुमच्याकडे पैसा जरी असला तरी लक्ष्मीतत्त्वाच्या अभावाने तुमची मुले बिघडतील, कुटुंब उध्वस्थ होईल. पण तुमचे कुटुंब जर आदर्श असेल तर तुमच्याभोवती तुमचे वेगळे जग निर्माण करू शकता. अशी अनेक स्थाने वेगळे विश्वच निर्माण करू शकतील. तुम्ही कशाचाच त्याग करत नाही पण त्यातून फक्त आनंद उपभोगता. तुमच्यातील उदारता तुम्हाला आनंद देते, तेथे कंजूषीला वाव नसतो. सर्व काही आनंदमय वाटते. मलाही आनंद होतो. दुसऱ्याला देण्याने मोठे आशिर्वाद मिळतात. याच्या विरुद्धचे लोक मूर्खपणात असतात. स्वतःच बावळट असतात. तर पुढील पिढीसाठी मुलांसाठी आदर्श घर बनविणे हे एक महान कार्य आहे. आणि ते केले पाहिजे. त्यातही कधीकधी स्वार्थ डोकावतो, ती फक्त आपल्या मुलांवरच वा आपल्या पतीवरच लक्ष देतात. तसे न करता सर्व कुटुंबीय हे वैश्विक पातळीवरच जाणले पाहिजे. सर्व साक्षात्कारी लोकांचे हे एक विश्वकुटुंब म्हणून पाहिले पाहिजे.

यातही स्त्रियांनी व्यर्थ बडबड करणे टाळले पाहिजे कारण आपण लक्ष्मी व महालक्ष्मीबद्दल बोलत आहोत. याची स्त्रियांना मला जाणीव द्यायची की तुम्हीच लक्ष्मी व महालक्ष्मी तत्त्वांचे प्रतीक बना. गप्पा मारणे हे चांगले नाही विशेष म्हणजे सहजयोग सोडून लोकांच्या गुणदोषांवर बडबड करणे हे घातक आहे. माझ्यासमोरही आले की बडबडतात, चैतन्याचा आनंद न घेता. सहजयोगाचे महत्त्व पुरुषांपेक्षा स्त्रियांनी समजून घेणे हे महत्त्वाचे आहे. त्याचा परिणाम मुलांवर कुटुंबावर नकळत होत असतो आणि मला असे सांगायचे की सहजयोगात स्त्रिया अजूनही त्या पातळीला पोहोचल्या नाहीत. त्यांनी मौन ठेवले तर फारच उत्तम त्यामुळे त्यांच्या चांगल्या कार्याला बाधा येते, हे त्यांच्या लक्षात येत नाही स्वतःच्यात काही विशेष समजणे जास्त घातक आहे.

लक्ष्मीतत्वाला आत्मसात करून महालक्ष्मीतत्त्वाला प्राप्त होणे, याची स्त्रियावर विशेष जबाबदारी आहे. यातून त्यांनी बाहेर येऊन इतर जगातील स्त्रियांपेक्षा आम्ही फार विशेष आहोत हे जगाला दिसले पाहिजे. अनेक चांगल्या सहजयोगिनींनी सहजयोगात आपल्या समस्यांची पर्वा न करता चांगले कार्यही केलेले मला माहित आहे.

यानंतर लक्ष्मीचे गजलक्ष्मीचे एक स्वरूप येते. तिची चाल एखाद्या हत्तीच्या चालीप्रमाणे डौलदार असते. स्त्रियांनी तसे असावे नुसते घोड्यासारखे उधळत नाचणे नसावे. तसेच पुरुषांनीही पहावे. लोकांना सारखा काहीतरी बदल हवा असतो. पण तो घातक नसावा त्यापेक्षा आत्मसाक्षात्कार घेऊन होणारा बदल घडवा. आपल्यात परिवर्तन झालेले पहावे, सहजयोगाला शोभेल असे. उच्चप्रतीचे परिवर्तन झालेले फुलांसारखे लोक दिसून येतात. पण काही मागे राहतात, संकुचितपणे ते मग केव्हातरी बाहेर पडतात. यांचे निरीक्षण करून प्रगति घडविणे ही सर्व सहजयोग्यांची जबाबदारी आहे. सहजयोगात अशा लक्ष्मी व लक्ष्मीपती हे, इतर धनकोपेक्षा वेगळे असतील, वेगळे वाटतील. ते पूर्णपणे संतुलित, प्रसन्न, दयाळू, प्रेमळ स्वभावाचे असे महालक्ष्मी तत्त्वांचे दर्शक वाटावे. याचा अभाव असणे म्हणजे आपण कुठेतरी कमी पडतो हे जाणले पाहिजे आपल्या व्यक्तीत्त्वाचा विकास घडविला पाहिजे, म्हणूनच आपण सहजयोगात आलो आहोत. आपल्याला सर्व विश्वाचे कल्याण घडवायचे आहे त्याकरिता आम्ही साधारण ३५ योजनांचे आराखडे तयार केले आहेत. काही भारतात काही बाहेर अशा योजना राबवीत आहोत. केवळ सर्वांच्या कल्याणासाठी. यासाठी सहजयोग्यांनी पूर्ण आलिप्त राहून, काहीही न सोडता, समर्पित राहून हे कार्य करणे महत्त्वाचे आहे. अगदी निरपेक्षपणे याबाबत आत्मनिरीक्षण करा. ध्यानातून ते करा तेव्हाच तुम्ही उन्नत व्हाल. तेव्हाच तुम्हाला आत्म्याचा आनंद मिळेल की ज्यामुळे तुम्ही क्षुद्र व व्यर्थ गोष्टीपासून दूर रहाल. तुमचे असे अर्थपूर्ण व्यक्तीमत्त्व बनेल की लोकांना तुमच्या कार्याचा हेवा वाटेल की अशी साधी माणसेही काही मोलाचे कार्य करू शकतात. तुमच्यातील निर्माणशक्ती वाढेल. तुम्ही दुसऱ्यांना हात द्याल त्यांना आत्मसाक्षात्कार द्याल, तुमच्यातील कलागुणही प्रतीत होतील, हे दिसून येत आहे. यातूनच इतरांना प्रेरणा मिळेल, अगदी सहजपणे. आपल्या सामूहिक जाणिवेतून हे सर्व कार्यान्वित होईल. त्याच तुम्हाला अनुभव आहे. हे सर्व महालक्ष्मी-तत्त्वामुळेच घडते. महालक्ष्मीतत्त्वावर तुमचे व्यक्तीमत्त्व चमकेल. या तुमच्यातील तत्त्वामुळेच तुम्ही साधक होता, उन्नत होता व तुम्हाला आत्मप्रकाश मिळतो. म्हणून महान सहजयोगी होण्यासाठी तुम्ही तुमच्यातील महालक्ष्मीतत्त्वाची जाणीव ठेवा. हे सर्व आपल्या व्यक्तीगत लाभासाठी नाही हे पण जाणले पाहिजे, एखाद्या वृक्षासारखे वृद्धिंगत व्हायला हवे. हे सर्व ध्यानातून व आत्मनिरीक्षणातूनच घडते. हृदयात त्यासाठी श्रद्धा हवी. सहजयोगावरही श्रद्धा हवी. वरील सर्व तत्त्वे सहजयोग्यामध्ये लक्ष्मीतत्त्व प्रदर्शित करतात. नसतील तर तुम्ही लक्ष्मीचे पुजारी नाहीत. म्हणून आज तुम्हाला त्या शहाणपणातून व योग्य जाणीवेतून समजलेल्या तुमच्यातील लक्ष्मीतत्त्व जे प्रकाशित झाले, त्याला माझे अनंत आशिर्वाद.

●●●

## कान्फूशियस

"क्रूर वाघापेक्षा देखील जुलमी राजसत्ता लोकांना अधिक क्रूर वाटत असते."

"नव्या दमाचा उत्साह व कर्तव्यनिष्ठा हीच यशस्वी राजनीतीची गुरुकिल्ली आहे."

"ज्यांना शिकवायच आहे त्यांच्याशी पुत्रवत् व्यवहार करा, प्रेमाने वागा."

"ज्याचे आचरण शुद्ध आहे, तो सन्मानाने चालतो आणि जो अति काहीच करीत नाही तो बुद्धिवान."

# अमृत-वाणी

प. पू. श्रीमाताजींचे नेहमीच उपदेश व मार्गदर्शन म्हणून प्रवचने करतात. त्यांचे शब्दांना अमृताचे मोल असते. वाचकांना स्मरण, मनन व चिंतन करण्यास उद्युक्त करण्यासाठी 'अमृतवाणी' या सदरांत श्रीमाताजींच्या भाषणातील अवतरणे दिली जातात.

– सहजयोग्याचे घर एखाद्या कमळासारखे असावे. अनेक काटे असलेल्या भुंग्यालाही कमळामधे रात्रभर वास्तव्य करता येते. सहजयोग्याचे हृदय गुलाबी कमळासारखे, आतिथ्यपूर्ण, मधुर व आनंदी असावे.

– सहजयोग्याची भाषा सुंदर असते, तो निकृष्ट साहित्य वाचीत नाही. निरर्थक गोष्टींवर पैशाचा वा शक्तीचा तो अपव्यय करत नाही तसेच आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करत नाही. वाद-विवाद, विनाकारण दुसऱ्यांबद्दल मत-प्रदर्शन करणे त्याला आवडत नाही.

– नियमित ध्यानधारण केल्यामुळे सहजयोग्याची निर्णय-क्षमता व विवेक शक्ति इतकी परिपूर्ण होते की त्याचे मन सन्मार्गापासून विचलित होत नाही; सहजयोगी मोहाला, भीतीला किंवा फसवणुकीला बळी पडत नाही. तो शक्तिशाली व स्वतंत्र असतो.

– सहजयोग्याजवळ अध्यात्मिक संवेदनशीलता असते. तो सर्व संतांना जाणतो, मानतो व त्यांचा सन्मान करतो. सर्व संस्कृतींमधे जे चांगले व सत्शीलताप्रधान आहे त्याचा तो आदर राखतो.

– सहजयोग्याला सामूहिकता आवडते व त्याचा सन्मान आणि रक्षण करण्याचे महत्त्व तो जाणतो. आपण या सामूहिकतेचे घटक आहोत याची त्याला जाण असते.

– सहजयोग्याची मुळे ईश्वरतत्वामधे खोल रूजलेली असल्यामुळे टीका व मतभेद झाले तरी तो क्षुब्ध होत नाही; तर भ्रान्तीच्या महासागरात केव्हाही तरून जाणाऱ्या जहाजासारखा तो असतो.

– बाहेर गेलेले किंवा इतर लोक कधी कधी सहजयोगाबद्दल अपप्रचार करतात. त्यांनी केलेल्या बदनामीमुळे सहजयोगी चिंतित अथवा क्षुब्ध होत नाही. आपण परमेश्वरी राज्यात असल्यामुळे कोणाच्याही असत्य बोलण्याचा किंवा आक्रमकतेचा आपल्या व सहजयोगाच्या प्रगतीवर काही परिणाम होत नाही.

●●●

# नवरात्री पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

कबेला : ८ ऑक्टो. २०००

आज आपण देवी अंबामातेची पूजा करणार आहोत. मानवी जीवाच्या गर्भावस्थेमधील कार्य करून माकडहाडांत स्थिरावलेली कुंडलिनी ही तिचीच शक्ती. डाव्या बाजूचे कार्य करताना ती अंबारुपात येते. मानवाची डावी बाजू फार महत्त्वाची आहे कारण या नाडीमुळेच तो संतुलन प्राप्त करू शकतो व त्यामुळेच तो सहजयोग्याचे व्यक्तिमत्व मिळवतो. तिची ही शक्ति मिळण्यासाठीच आपण तिची आराधना करतो. आपली डावी बाजू समृद्ध करणारी ती आरामदायक (Comforter) कार्य करते. अर्थात शांत निद्रावस्थेत आणते. माणूस जेव्हा भविष्यकाळासंबंधी विचार व योजना करण्याच्या मागे लागतो तेव्हा या आरामाची फार आवश्यकता असते. हे महत्त्वाचे कार्य करणारी ही देवता असल्यामुळेच आपण तिची पूजा करतो. तीच तुम्हाला शांति देते, कालनिर्मितीची क्षमता देते. पण त्याचबरोबर तुम्हाला भ्रान्तिमध्येही आणते. जे लोक परमेश्वरी सत्ता मानत नाहीत व त्याच्या विरोधी राहून खऱ्या साधकांसमोर अडथळे आणतात त्यांच्यासाठी ती माया निर्माण करते. तुम्ही लोकांनी सत्य जाणलेले आहे व त्या लोकांपासून ती तुम्हाला दूर ठेवते. अशा तऱ्हेने ही देवी कुण्डलिनी रुपात तुमच्यामध्ये असते व दुसऱ्या रूपाने डाव्या बाजूचे कार्य चालवते.

देवीचे हे कार्य सात स्तरांवर, सरळ व ऊर्ध्व मार्गांनी चालते व हे फार महत्त्वाचे व महान कार्य आहे. या सातही स्तरांवर सात निरनिराळ्या देवी स्वरूपात – शखिनी, दामिनी इ-तिचे कार्य चालते. तुम्ही जेव्हा डाव्या बाजूकडे झुकू लागता तेव्हा या तिच्या सात शक्त्या तुम्हाला परत मार्गावर आणतात. तसेच डावी बाजू कमकुवत झाल्यामुळे होणारे मनोदेहिक आजार तिच्या शक्तीमधूनच बरे होतात. कधी कधी तुम्ही काही ना काही कारणांमुळे सतत डावी-उजवीकडे लंबकासारखे फिरत असता त्यावेळीही हीच शक्ति तुमचे संरक्षण करते. अशा तऱ्हेने शांति प्रदान करणारी, तुमचा सांभाळ करणारी, मनोदेहिक आजार बरे करणारी, संरक्षण करणारी अशी ही महान शक्ति आहे. म्हणून तिच्यासमोर नतमस्तक होऊन आपण तिची पूजा केली पाहिजे; तिचा आदर राखला पाहिजे. ती तुमची आईच आहे हे नीट लक्षात ठेवले पाहिजे.

त्याचप्रमाणे तुम्हाला दुसरा जन्म देणारी कुण्डलिनी– अंबा – ही तुमची स्वतःची आई आहे. तीच देवी तुमची डावी बाजू सुव्यवस्थित ठेवते व तुमच्या उत्थानासाठी मदत करते. अति विचार करण्यामुळे सतत धडपड करत राहण्याच्या सवयीमुळे आपण उजवीकडे जात असल्याचे ही तुमच्या नजरेस आणते. उजव्या बाजूकडचे सिझोफ्रेनियासारखे गंभीर आजरही बरे होऊ शकतात. यकृताचे दोषही दूर होतात. दमा, हृदयरोग इ. त्रासही होऊ शकत नाहीत. तुमचे लक्ष सतत डाव्या बाजूकडे लावणारी सातही स्तरांवर कार्य करणारी ही देवी आहे. पण त्यासाठी तुम्ही स्वतःकडे लक्ष ठेऊन काळजी घेतली पाहिजे. उदा. तुम्ही अ-गुरुंच्या प्रभावाखाली येता तेव्हा ते तुम्हाला डावीकडे वळवतात; तांत्रिक लोकही मृतात्म्यांना कबजांत घेऊन तुमच्याकडून कार्य करवतात व तुम्हाला जाळ्यात ओढतात. अशा कारणांमुळे तसेच कसली काळजी व चिंता करण्यामुळे उजवीकडचे आजार सहसा होत नाहीत; पण त्यातही अतिरेक होता कमा नये. कारण उजव्या बाजूपेक्षा डाव्या बाजूचे आजार जास्त गंभीर असतात. पण तांत्रिकांच्या बाबतीत लक्षात घ्यावयाची आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांनी कब्जात घेतलेले मृतात्मे डाव्या किंवा उजव्या अशा दोन्ही बाजूंनी कार्य करणारे असतात. उजव्या बाजूचे मृतात्मे महत्त्वाकांक्षी व आक्रमक बनवतात; हवेत तरंगण्याची वा सफर करण्याची इच्छा असणे, भविष्यकालातील घटना सांगण्याची लालसा बनवणे हे याचे प्रकार व त्यांचा स्त्रोत चुकीचा असतो. म्हणून त्यांच्या जाळ्यात न अडकणे चांगले. नाही तर माणूस भलत्या सलत्या गोष्टींच्या मागे लागतो. डाव्या बाजूच्या मृतात्म्यांचे प्रकार वेगळे असतात. ते तुम्हाला फसवतात, तुम्हाला खोटे-नाटे सांगून तुमचे पैसे लुबाडतात, हे सर्व प्रकार इतक्या गुप्तपणे चालतात की आपण फसत आहोत हे तुमच्याही लक्षात येत नाही. हे दोन्ही बाजूचे चुकीचे उद्योग करणारे लोक स्वतःचा ऐहिक स्वार्थ साधण्याची धडपड करण्यात दंग असतात. मूलतत्त्ववादी लोकांच्या डोक्यातही अशी भुतेच स्वार झालेली असतात; म्हणूनच ते आपल्या धर्मापेक्षा वेगळ्या धर्माच्या लोकांना ठार मारण्यासाठी कचरत नाहीत.

पण या सर्व प्रवृत्तींचा बिमोड करण्यासाठी ही पृथ्वी व सारी पंचमहाभूत तत्त्वे सिद्ध आहेत. जिथे-जिथे हा अतिरेक होतो तिथे धरणीकंप, पूर, वादळ इ. कडून त्यांचा संहार केला जातो.

भारतामधे लातूर या गावात दारु पिणे फार बोकाळले होते, इतके की गणेशोत्सवातही लोक दारुच्या नशेत प्रत्यक्ष मंडपामधे वाटेल ते गोंधळ घालत असत, विसर्जनानंतर तर दारुचा अतिरेक होऊन लोक बेहोष व्हायचे. त्यावेळी मोठा भूकंप झाला व खूप जीवित-वित्त हानी झाली. पण तिथे सहजयोगाचे केंद्र असलेल्या बिल्डिंगला काही नुकसान झाले नाही. त्या बिल्डिंगच्या सभोवार एक गोल मोठा चर पडला पण आतमध्ये काहीही पडझड झाली नाही व कुणाही सहजयोग्याला मार लागला नाही की कुणी दगावला नाही. सत्याच्या विरोधात कार्य करणाऱ्या शक्तींचा नाश करणारी शक्ति ही देवीची शक्तिच आहे. हिटलरचा असाच पराभव झाला. त्याच्या डोक्यात ज्यू लोकांबद्दल द्वेष भरला आणि असंख्य ज्यू लोकांना त्याने ठार केले. श्रीगणेशांचे प्रतीक असलेले स्वस्तिक त्याच्या सैन्यबलाचे चिन्ह होते. म्हणून देवीने त्याच्या बुद्धीमधे प्रवेश करून त्याला भ्रान्तिमधे टाकले व उलट्या स्वस्तिकाचे निशाण त्याला वापरण्याची चूक त्याच्याकडून झाली व त्याचा पराभव झाला. जगामधील अनेक देशांचा इतिहास बघितला तर अशी खूप उदाहरणे दिसून येतील. ही भ्रान्ति असे कार्य करताना विरोधी, घातक प्रवृत्तींच्या व राक्षसी लोकांच्या डोक्यातील चांगले-वाईट, कल्याणकारक व हानिकारक हा विवेक गोंधळात आणते व नेमक्या चुकीच्या गोष्टींमधून त्यांचाच ऱ्हास होतो. म्हणूनच "भ्रान्तिरुपेण संस्थितः" अशी देवीची स्तुति केलेली आहे. सहजयोग्यांजवळ अशी घातक व अ-गुरु माणसं ओळखण्याची शक्ति म्हणूनच दिली आहे; हाताच्या बोटांवर तुम्ही हे जाणू शकता व ओळखू शकता आणि इतरांनाही त्यानुसार सावध करू शकता. **कधी कधी चांगले साधकही या भ्रान्तिमधे येऊन स्वतःचे नुकसान करून घेतात** याचेच मला कधी कधी आश्चर्य वाटते. परदेशात गेलेले भारतीय लोक अशाच एका बाबाजीच्या मोहजालात अडकलेले आजकाल आढळतात. पबमधे दारू पिऊन धुंद होऊन रस्त्यावर पडलेले लोक पाहूनही तिकडे जाऊ नये असे कुणाला वाटत नाही. वाईट, चुकीच्या गोष्टी करण्यात आपण स्वतःचेच नुकसान करुन घेतो एवढी साधी समज लोकांच्या डोक्यात कशी येत नाही याचे मलाही आश्चर्य वाटते. वर आणखी ख्रिस्तांनीही पाण्याची वाइन (Wine) करून सर्वांना दिली या नावाखाली दारू पिण्याचे समर्थन करतात. ही अगदी खोटी गोष्ट आहे, त्यांनी फक्त द्राक्षाचा रस बनवला व ते पाणी सर्वांना प्यायला दिले. पण हे लोक आपल्या अकले (!) मधून विचित्र कल्पना काढतात व लोकांना फसवतात. पण हेच लोक स्वतःचेच नुकसान करून घेतात.

**सध्याच्या या कलियुगामध्ये लोकांना विवेकबुद्धीचा विसर पडला आहे. पण हीच गोष्ट त्यांच्या लक्षात येईनाशी झाली आहे.** ती एक प्रकारची फॅशन बनत चालली आहे. त्याच्यामुळेच अमेरिकेत आजकाल महिला अंग जास्त उघडे टाकण्याची फॅशन कौतुकाने वापरत आहेत. स्लीव्हलेस व खांदे उघडे राहणारे कपडे वापरल्यामुळे वरच्या भागातील दोन्ही चक्रांना त्रास होतो व नुकसान होते. विशुद्धि व आज्ञा या दोन्ही चक्रांची फार काळजी घेतली पाहिजे; तसेच खांद्यांवरची श्रीचक्र व ललिता चक्रयांची पण उघडी पडणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. ही चक्रे बिघडली तर सायनस, पॅरालिसिस, पार्किन्सन इ. रोग होतात. आज्ञा चक्र उघडे न राहण्यासाठीच कुंकु लावण्याची पद्धत आहे. तसेच उघडे पडतील असे कपडे घालणे पण नुकसानकारक आहे. कुणी मूर्खाने काही विचित्र फॅशन सुरू केली की सगळे मेंढ्यांच्या कळपासारखे त्याच्या मागे जातात. अशा विचित्र फॅशनचे कपडे वापरणाऱ्या स्त्रियांकडे आकर्षित होणारे पुरुषही कुचकामी असतात असेच मी म्हणेन. भारतातही काही स्त्रिया या आधुनिक (!) पेहरावाचे अनुकरण करू लागल्या आहेत. उलट्या प्रकारचा मूर्खपणा म्हणजे मुसलमान महिला वापरतात तसा पायाच्या बोटांपासून पूर्ण चेहरा झाकून टाकणारी बुरख्याची पद्धत; तीही चुकीची आहे.

ही सर्व भ्रान्ति आहे व अंबामाताच ती निर्माण करते आणि या भ्रान्तिमधे गुंतल्यावर लोक वेड्यासारखे वागू लागतात व त्यांना स्वतःलाही ते समजत नाही. इतर सगळे करतात म्हणून आपणही त्यांच्यासारखेच केले पाहिजे अशी मनाची समजूत घालायची याला काय अर्थ आहे? फॅशन पत्करण्यात हीच चूक प्रत्येकजण करत असतो. कदाचित एखादा सैतान हे कार्य करत असावा. देवीची भ्रान्ति यासाठीच असते म्हणजे उत्क्रान्तीच्या प्रवासामधील अपात्र असलेले प्राणी जीवन-चक्राबाहेर पडावेत. आता सहजयोग्यांनाही मी रोज डोक्याला तेल लावण्यास सांगत असते पण सर्वजण ते करतातच असे नाही. **प्रत्येकजण स्वतःबद्दल स्वतःच जबाबदार असतो व आपल्यामधे काय कमी पडत आहे हे प्रत्येकाने स्वतःच समजून व जाणून घेतले पाहिजे. निदान तसा प्रामाणिक प्रयत्न करायला हवा.** तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. चैतन्य-लहरींमधून तुम्ही सर्व समजू शकता, बरोबर व चूक हे जाणू शकता. पूर्वी बरेचसे सहजयोगी– अलिकडे सुधारणा झाली आहे– कोण सहजयोगी काय चुका करतो, कुणामधे कसेल भूत शिरले आहे असल्या तक्रारी माझ्याजवळ करत असत. मला सांगून काय होणार आहे? त्यांच्यापासून दूर रहा. त्यांना बाजूला टाका. नंतर त्यांनाच समजेल की ते सत्यापासून अलग झाल्यामुळे असुरक्षित होत आहेत व त्यांनाच परत यावेसे वाटू लागेल. ज्यांना यावेसे प्रामाणिकपणे वाटेल त्यांना येऊ द्या. जे त्या लायकीचे नाहीत त्यांना बाहेरच राहू द्या. कारण

ते मूर्ख असले तर इतर साधेसुधे लोकही त्यांच्या नादी लागतील. म्हणून दुसऱ्याच्या प्रभावामुळे जो चुकीचा वागतो तो खरा सहजयोगीच नाही. सहजयोगामधे आल्यावर तुमच्यामधील विवेक जागृत होतो व तुमची आई अर्थात कुण्डलिनी ते कार्य करते. तसेच सर्व सद्गुणांची प्रतिष्ठा तुम्हाला मिळवून देते. तीच तुमची डावी बाजू ठीक करते. काही सहजयोग्यांना सहजयोगाबद्दलही व त्याच्या कार्याबद्दल तक्रार करण्याची, असंतुष्ट राहण्याची सवय असते; माझ्याजवळही अशाच कुरबुरी करत असतात. हे बरोबर नाही. म्हणून सहजयोग्यांनी आपली विवेकबुद्धी समृद्ध केली पाहिजे, दुसऱ्यांना व विशेषतः स्वतःला नीट ओळखले पाहिजे. आपण काय करतो व का करतो हे तटस्थपणे लक्षात घेतले पाहिजे. ही क्षमता डाव्या बाजूकडूनच मिळते; म्हणून डावी बाजू अधिकाधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थात त्यामधे अतिरेकीपणा येऊ नये कारण मग दुसरेच त्रास होण्याची शक्यता असते. आता एखाद्या आक्रमकपणे वागणाऱ्या, पैशाच्या बातीत प्रामाणिक नसणाऱ्या या सहजयोग्याच्या कबजात आलात तर ही डावीकडची शक्ति एका मर्यादेपर्यंत तुम्हाला मदत करते.

आता तुम्ही हे समजून घेतले पाहिजे की सहजयोगी म्हणून तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. तुम्हाला मिळालेल्या प्रकाशामधे, तुमच्या चेतेनमधे पडलेल्या प्रकाशामधे तुम्हाला पुढे चालायचे आहे. त्या प्रकाशामधेच चांगले काय व वाईट काय, चांगला व योग्य कोण व खराब कोण हे तुम्हाला समजणार आहे. सहजयोगामधेही विरोधी कार्य करणाऱ्या निगेटिव्हिटी असू शकतात. म्हणून तसल्या गोष्टी वा व्यक्तींपासून तुम्ही दूर राहिले पाहिजे. तुम्ही आनंद मिळवण्यासाठी साक्षात्कार घेतला आहे. तुमचे चित्त कुणीकडे खेचले जात आहे इकडे लक्ष ठेवा. इथली ही सजावट व सुंदर-सुंदर फुले पाहून माझे हृदय आनंदाने वाहू लागते. पण बऱ्याच जणांचे तिकडे लक्षही जात नाही. देवीने अनेक राक्षसांशी सामना केला व त्यांना ठार केले. तुम्ही पण आता हे राक्षस ओळखले पाहिजे व लोकांना त्यांच्यापासून सावध केले पाहिजे; त्यांच्यापासून काही मिळणार नाही हे त्यांना खडसावून सांगितले पाहिजे, म्हणजे अनेक जणांना तुम्ही त्या राक्षसांपासून वाचवू शकाल. सहजयोगामुळे तुमचे खूप फायदे झाले आहेत. म्हणून फालतू गोष्टींच्या मागे लागू नका. सहजयोग्यांनी इतरांची जबाबदारी उचलायची आहेच पण स्वतःची जबाबदारी स्वतःच सांभाळायची आहे.

देवीपासून तुम्हाला मिळालेली आणखी एक शक्ति म्हणजे श्रद्धा; तुमची ही श्रद्धा डोळस हवी व तिचे महत्त्व फार मोठे आहे. श्रद्धा आनंद देणारी असते. पृथ्वीच्या पाठीवर अनेक अवतरणे झाली पण त्यांच्या जीवितकालामधे कुणी त्यांची पर्वा केली नाही. खिस्तांना सुळावर चढवले पण त्यावेळी कुणी त्याविरुद्ध ब्र काढला नाही. एरवी देशासाठी व धर्मासाठी अनेक लोकांनी पराक्रम केले पण अवतरणांबद्दल त्यांच्या जीवितकालामधे त्यांच्याबद्दल अशी श्रद्धा कुणी बाळगू शकले नाहीत. कालच इथे यासंबंधी एक नाटिका आपण बघितली, माझे मलाच भरुन आले. माझ्याबद्दल मात्र मी जिवंत असतानाही तुमच्या मनात काही शंका राहणार नाहीत अशी तुमची श्रद्धा आहे आणि त्याचे प्रत्यंतर देणारे अनेक चमत्कार तुम्ही अनुभवले आहेत; माझ्या फोटोमध्ये परमचैतन्याचे खेळ तुम्ही पाहिले आहेत; माझ्या मागे साक्षात श्रीगणेश उभे असल्याचाही एक फोटो आला आहे. पण माणसाला साक्षात जिवंत अवतरण समजणे व मानणे अवघड झाते. अध्यात्मिक इतिहास हेच सांगतो. श्रीकृष्ण-श्रीराम, खिस्त ही सारी अवतरणेच होती पण त्यांच्या पश्चातच लोक त्यांच्या नावांचा जप व पूजा करू लागले. ज्ञानेश्वरांनीही चमत्कार करून दाखवले पण सूज्ञ आणि जाणकारच त्यांना ओळखू शकले. माझ्या बाबतीतही काही प्रकार झाले पण जोपर्यंत मी आहे तोपर्यंत मला कोणी काहीही करू शकणार नाही. माझी इच्छा असेल तोपर्यंत मी राहणारच. ही सर्व प्रेमशक्ति आहे; करुणा व प्रेमाने ती ओतप्रोत आहे. इतके सर्व असूनही सहजयोगात सर्व प्रत्यक्ष अनुभूति मिळूनही तुमची श्रद्धा कमी पडते आणि ही देवीच तुम्हाला ही श्रद्धा देणार आहे; म्हणून तिच्या चरणी नतमस्तक होऊन तिची पूजा करून ती श्रद्धा प्रदान करण्याची मनोभावे प्रार्थना केली पाहिजे. अशी गाढ व परिपूर्ण श्रद्धा निर्माण झाल्यावर जे कराल त्यात यश मिळेल. ती श्रद्धा रुजवण्याचा प्रयत्न करा. मग तुम्हाला आनंद व समाधान मिळेलच पण सहजयोगाबद्दल पूर्ण समर्पण व बांधिलकी प्रस्थापित होईल.

परमेश्वराचे सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

## ला ओ त्से

जो मूर्तिमंत धर्म बनून गेला तो लहान बालकासारखाच होऊन जातो. मग त्याला विंचू दंश करीत नाही. जंगली पशू त्यावर झडप घालीत नाही की, हिंस्त्र पक्षी त्याला चोच मारीत नाही!

''सुखाची कामनाच दुःखाचे बीज रुजवीत असते.''

# प. पू. श्रीमाताजींचे प्रवचन

राहुरी २६ फेब्रु. ८४

स्वस्थलेचे उगमस्थान आपला आत्मा आहे. आपले चित्त जेव्हा आपल्या आत्मसुखाकडे राहते तेव्हा बाह्यातील सुखोपभोग गळून पडतात. आपण कोठे राहतो, कोठे झोपतो, काय खातो, काय करतो याची चिंता करत नाही. अशा बाह्य गोष्टीवरील लक्ष दूर करण्याचा प्रयत्न करा व आतील जाणीवा वरील लक्ष वाढवा. आपले घडाळ्याबरोबर धावण्याची आपली सवय (conditioning) घालवण्यासाठीच तुम्ही येथे आलात. ही जीवघेणी धावपळ एकदाची थांबली पाहिजे, ती आपोआप थांबेल, जेव्हा ध्यानातून आपले चित्त आत येईल तेव्हा आतून शांतता मिळवाल, जी प्रत्येक मानवाला आवश्यक आहे, ज्यामुळे आपण सर्व जगाला विनाशापासून वाचवू.

तुमच्या लक्षात आलेच असेल की सहजयोग वेगाने वाढत आहे. त्याने गती घेतली आहे. सर्व जगाला मंथून टाकणाऱ्या या महान क्रांतीकारक चळवळीचे आपण एक पायिक म्हणून आपण आता सर्व तयारीनिशी सिद्ध असले पाहिजे. आपल्या उथळ विचारांना व उथळ वागणुकीला टाकून आपण या कार्यात पूर्णपणे उतरणे हे महत्त्वाचे आहे. आपण सर्व प्रबळ आहोत. याशिवाय तुम्ही ईश्वरी शक्तीने आशिर्वादित आहात. या शक्तीचा स्वतःकरता पूर्ण उपयोग करा. तिच्याशी एकाकार व्हा. त्याकरिता आपल्या शरीराला टाकीसारखे छिना शरीराला मनाला अहंकाराला रोका आणि त्या पैलूतून तुमची सुंदर प्रतिमा साकारू द्या ज्याकरिता तुम्ही निवडले आहात.

दुसरी गोष्ट म्हणजे माझे तुमच्या देशातील दौऱ्यामुळे तुम्हाला अनेक चांगल्या गोष्टी प्राप्त झाल्या आणि जेव्हा तुम्ही माझ्या या देशात येता तेव्हा तुम्ही इथलेच आहात असे तुम्हाला वाटते आणि तिकडच्या देशात तुमचे जीवन उध्वस्त असल्यासारखे वाटते. इकडे तुम्ही येता आणि खऱ्या अर्थाने संपन्न होता आणि तिकडे देशात मी एवढे प्रयत्न करते, खूप कष्ट घेते सर्वकाही तुमच्याबरोबर राहून करते तरी फारसे यश येत नाही. पण येथे ते सहज प्राप्त करता. आपले उध्वस्त जीवन विसरा. मला तुम्ही येथूनच तिकडे गेला आणि आता परत येथेच आलात असे वाटते, स्थलांतर कायद्यामुळे या स्थितीत मला वाटते तुम्ही इथेच तुमचे आश्रम स्थापा, तुमच्या योजना इथेच राबवा. त्यामुळे तुमच्या येथे सतत येण्याने तुम्ही उन्नत व्हाल. येथे सतत ३/४ महिने राहून थोडी मिळकत जमवून येथे तुम्ही स्वतःला घडवा. तिथे अनेक प्रयत्न करून फारसे काही प्राप्त झाले नाही. आपल्या या सर्व दौऱ्यातून शेवटी हेच सिद्ध होते.

इथले जीवन खडतर, रस्ते खडबडीत असले तरी आपण सर्वजण मजा घेत आहात. मी जेव्हा तुम्हाला पहाते, तुमचे सर्व काही व्यवस्थित आहे, अधिक उत्तम व सर्व काही सुस्थितीत जमले आहे जसे घड्याळाची गुणवत्ता ठरविण्यासाठी त्यांना वाहत्या पाण्यात सोडले जाते नंतर तबकात टाकून जोरात हालविले जाते. या परीक्षेतूनही नंतर जे व्यवस्थित चालतात ते कुठल्याही परिस्थितीत कार्यक्षम राहतात तेच ठीक समजले जातात. त्याचप्रमाणे तुम्हाला या सर्व खडतर प्रक्रीयेतून तुम्ही बाहेर पडता व आतून पक्के होता. हे सर्व घडताना पाहून मला आनंद वाटतो आणि हीच गोष्ट आपण प्राप्त केली आहे.

नंतर आपले लक्ष पैशापासून दूर असले पाहिजे. ही एक मोठी समस्या आहे. अगदी श्रीमंत राष्ट्रेही सतत पैशाच्या मागे असतात. भारतापेक्षा जास्तच, हे पाहूच आश्चर्य वाटते. प्रत्येक पै न् पै मोजून घेणारे हे देश खरंच प्रगत आहे का यावर विश्वास बसत नाही. भिकाऱ्यापेक्षाही कठीण परिस्थिति पैशाची ही चटक फारच विलक्षण आहे. तरी तुम्ही त्यापासून लांब रहा, पैशांची ही नाणी मोजत रहाण्यापेक्षा देवांची नावे घ्या.

यानंतर सुखसोयींची लागलेली चटक, तिकडचे जीवन इतके सुखावह आहे असे मला वाटत नाही. इकडे रात्रीही तुम्ही फिरु शकता. येथे कोणीही तुमचे पाकीट पळविणार नाही, बांगड्या हिसकावणार नाही. तुम्ही निर्धास्तपणे फिरु शकता. दारु पिऊन एकमेकांशी धक्काबुक्की करणारे दिसणार नाही. सर्व काही सुरळीत आहे. ही एक मोठी प्राप्ती आहे.

येथे तुम्हाला जरुर असणाऱ्या सुखसोयींचा नंतर विचार करा. या सर्व आधुनिक सुखसोयी इथे तितक्या आवश्यक नाही. इथल्या परिस्थितीशी जुळत्या नाहीत. असल्या अनावश्यक कल्पना येथे उतरवण्याची जरुर नाही. एकंदरीत येथे वैयक्तिक स्वच्छता उत्तम होते, तरीही येथील लोकांना सर्वसामान्य स्वच्छता करण्याची शिकवण तुम्ही त्यांना दाखवा. अशा तऱ्हेची तुमच्यातील देवाण घेवाणेची क्रिया फलदायी आहे, हे मात्र निश्चित. आणि तुमच्या अंतरात जे काहीघडते त्यामुळे तुम्ही वेगाने उन्नत व्हाल. येथे तुम्ही येऊन काही काळ राहून काही मिळवा व मग तुमच्या देशात परत जा. मग तेथील निगेटीव्हीटीची तुम्हाला पूर्ण जाणीव होईल.

नंतरचा मुद्दा म्हणजे तुम्ही येथे काही तरी साध्य करण्यासाठी आला आहात याची जाणीव ठेवली पाहिजे. तुमच्याकडून घेण्यासारखे तर काही नाही. तुम्हीच काही मिळवा. तुम्ही विद्यार्थ्यासारखे आहात, काहीतरी चांगले शिकून घ्या, शिस्त निर्माण करा, एखाद्या शिष्यासारखे शंका विचारा, हे काय आहे? कसे आहे? हे घर आहे, छान आहे. अवास्तव गोष्टींना थारा देऊ नका, वायफळ गप्पांना दूर ठेवा. ज्याचा काही संबंध नाही त्या सर्वांचा त्याग करा. त्यापेक्षा शांत रहा व आतून ती वाढवण्याचा प्रयत्न करा. येथील लोकांना वेळ नसतो. त्यामुळे ते बडबडत नाही, ते आपल्या कामात गुंतलेले असतात. तुम्हाला तिकडेही भरपूर वेळ असतो, येथेही असतो म्हणून तसे वागू नका. हे करणे चूक आहे.

काही वेळेला आतूनच तुम्ही स्वतःच्या मनाशी बोलत राहता. सतत जसे काही गोष्टींचे पृथःकरण करत बसता किंवा टीका करणे, दोष काढणे आणि विचार करत बसणे 'हे असे करणे' अधिक चांगले झाले असते असे झाले तसे झाले हे सर्व काही चालूच असते. असे हे आतून चालू रहाते ते बंद करा. अशा लोकांना ख्रिस्ताने Murmuring suals (पुटपुटणारे) म्हणतात, त्यांच्यापासून सावध रहा. पण ते तुमच्या आतच अस्तित्वात असतात. अशा मूर्खपणाच्या बाबींकडे दुर्लक्ष करा. त्यावर बारीक नजर ठेवा ज्याची तुम्हाला मदतच होईल. एकंदरीत मागील दौरा व यावर्षीच्या दौऱ्यामुळे तुमचे सामर्थ्यात अनेक शक्यता माझ्यासमोर आल्या ज्यामुळे मी खूप आनंदीत झाले. मीखरोखरच समाधानी आहे की यावर्षी तुम्ही जे मिळविले, येथील नवीन वातावरणात तुम्ही बनला सर्वकाही नम्र अगदी शांतपूर्ण आणि आत ओढून घेणारे चैतन्य सर्व काही महान, आनंददायक असे मला आहे.

याबद्दल मी तुमची सर्वांची आभारी आहे आणि मला आशा आहे की अशारीतीने तुमची अधिक प्रगति होत जाईल.

तुम्हाला अनंत आशीर्वाद.

●●●

### नानक

''जानवे (यज्ञोपवीत)

करुणेच्या कापासातून सूत काढले पाहिजे. त्याला सत्याचा पीळ देऊन संयमाची गाठ मारली पाहिजे. असले यज्ञोपवीत आत्म्याला पाहिजे ते तुटणार नाही, किंवा खराब होणार नाही, हरवणार किंवा जळणार नाही.''

''न कोई हिन्दू है । न कोई मुसलमान ।''

''काहे, रे, बन खोडान जाई?

सर्व निवासी आलेपा, तोही संग समाई ।

''अरे, देव जंगलात का बसलाय? तो तर सर्वत्र आहे.''

''फुलात सुगंध, आरशात प्रतिबिंब तसा ईश्वर अंतःकरणांत सदैव रहात असतो.''

## प.पू. श्री माताजींचे पुण्यात आगमन





## म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, पुणे









# शिव पूजा, फेब्रुवारी २००१, पुणे, काही क्षणचित्रे









